

हिरकणी
डॉ. सुजाता मोरे-चव्हाण

# हिरकणी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हिरकणी

(सत्यकथासंग्रह)

डॉ. सुजाता मोरे चव्हाण

ई साहित्य प्रतिष्ठान

# हिरकणी (सत्यकथासंग्रह)

लेखिका : डॉ. सुजाता मोरे चव्हाण

Asst.prof.

Advanced centre for women studies

Tata Institute for Social Sciences

drsujatachavan61@gmail.com

phone no.09867934108

मुखपृष्ठ : चैतन्य चव्हाण

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com


esahity@gmail. com


प्रकाशन : ८ मार्च २०१९


(आंतरराष्ट्रीय महिला दिवस)


©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.


डॉ. सुजाता चव्हाण
राजेश्री शिंपी
खाऊ आनंदे


वाचादोषावर मात
ओठ व टाळू यांतील व्यंग
पालकांकरिता मार्गदर्शक पुस्तिका
डॉ. सुजाता चव्हाण


डॉ.सुजाता मोरे चव्हाण
संकलन
अनुभवांचे


डॉ. सुजाता चव्हाण
कुटुंब न्यायालय

## डॉ. सुजाता मोरे चव्हाण यांची ई साहित्यतर्फ़े आजवर प्रकाशित झालेली काही पुस्तके

कुटुंब न्यायालय : कायदा

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kutumb_nyayalay_sujata_chavan.pdf

वाचादोष : आरोग्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vachadosh_sujata_chavan.pdf

खाऊ आनंदे : पाककला

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/khaoo_anande_sujata_rajeshri.pdf

संकलन अनुभवांचे : अनुभव

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sankalan_sujata_chavan.pdf

# हिरकणी

डॉ. सुजाता मोरे चव्हाण

आमच्या साठी खस्ता खाणाऱ्या

व आम्हाला जीवनाचे शिक्षण देणाऱ्या

प्रिय आईस अर्पण.

# मनोगत

## दीपस्तंभ!

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी असे म्हणणारी आपली भाषा आणि महिलांना देवीसमान मानणारी आपली विचारसरणी! अगदी त्याच्या विरुध्द वृत्तपत्रादी माध्यमांत येणाऱ्या महिलांवरील अत्याचारांच्या निराशाजनक बातम्यांचे वास्तव! काहीही म्हटले तरी वस्तुस्थिती हीच आहे.

पण काळया मेघास सोनेरी किनार असतेच आणि रात्र झाली की पहाट केव्हा न केव्हा आल्यावाचून रहात नाही. एकूण निराशाजनक वातावरणात आजूबाजूला कित्येक हिरकणीसम स्त्रिया दिसतात, ज्यांनी परिस्थितीशी हार न मानता झुंज दिलीय. त्यातून त्या यशस्वी झाल्या. हे यश लौकिकार्थाचे यश असेलच वा असावे असे नाही. विपरित परिस्थितीत हार न मानता दिलेली झुंज, त्यातून वैयक्तिक आयुष्य सावरत त्यांनी समाजास आदर्श घालून दिला. अशा कित्येक स्त्रिया दीपस्तंभासारख्या मार्गदर्शक ठरु शकतात.

खरे तर कोणाचा तरी आदर्श बदलण्यासाठी वा समाजात बदल घडविण्यासाठी या शूर स्त्रियांनी  त्यांचे जीवन जगले असेल असे नाही. पण स्वत: आपण एक व्यक्ती म्हणून अंगच्या गुणांची वृध्दी पूर्णपणे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आजूबाजूची परिस्थिती त्यांना अनुकूल होतीच असे नाही. पण प्रतिकूल परिस्थितीवर त्यांनी मात केली हे मात्र सत्य आहे.

या स्त्रिया तुमच्या आमच्यातल्याच आहेत. आपल्या जवळच्या आहेत. प्रत्येक स्त्रीमध्ये लढण्याची ताकद असतेच. त्यातल्या मला भेटलेल्या स्त्रियांपैकी काहींची ही कहाणी.

या पुस्तकात अशाच यशस्वीपणे जगणाऱ्या स्त्रियांच्या जीवनकथा आहेत. या सर्व स्त्रिया महाराष्ट्रातील आहेत. काही शहरातल्या आहेत तर काही गावातल्या आहेत. तीन पिढ्यांतील  या स्त्रिया जातीने वेगवेगळया, आर्थिक स्तर व शिक्षण यातील फरक असलेल्या आहेत. प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढून आपले आयुष्य समृद्ध करणाऱ्या या स्त्रियांमध्ये एक समान धागा आहे - त्यांचा जीवनाकडे पहाण्याचा सकारात्मक दृष्टीकोन, त्यांची जिद्द, त्यांनी कमावलेले यश!

पिढ्यांमध्ये काळ बदलला. सामाजिक परिस्थिती बदलली. स्त्रिचे स्थान (कुटुंबातील व समाजातील) काही प्रमाणात बदलले. 'चूल व मूल' ह्या सोबतच बाहेरच्या विश्वात स्त्री वावरायला लागली. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत गेली. शिक्षणाने तिची निर्णयक्षमता वाढली. पण तरी आजही तिला पुरुषांपेक्षा कमी दर्जाचे मानले जाते. पुरुषासोबत खांद्याला खांदा देऊन काम केले तरी तिचे कौतुक करतांना तिची तुलना पुरुषाशीच केली जाते. म्हणजे समाजाची मोजपट्टी ही पुरुषांच्या तुलनेतूनच होतेय. स्त्री स्वत: एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून कधी जगू शकेल? समाजात पुरुष व स्त्री दोघेही हवेत. दोघांनी बरोबरीने चालायला हवे आहे. दोघांनी मिळून समाजातील दृष्ट प्रवृत्ती-चाली-प्रथा ह्यांचा सामना करायला हवा.

एकूणच परिस्थिती विपरीत. स्त्रीवर्गास कालीमाता किंवा दुर्गेची उपमा देत त्याच्या अगदी उलट असा सामाजिक दृष्टीकोन आणि व्यवहार. त्याबरोबरीने अत्याचार व हिंसा देखील. गर्भाशयातील स्त्री भ्रूणही या हिंसेतून सुटला नाही. त्यात शारीरिक आणि मानसिक कौटुंबिक हिंसेची भर. या अत्याचार आणि हिंसेचे स्वरुप व्यक्तीगणिक बदलत रहाते. आणि या स्त्रियांचा त्यावरच्या प्रतिक्रियाही बदलतात. मानसिक सामर्थ्याने प्रतिकारास सिध्द होत या सर्व 'अबला' म्हणवणाऱ्या स्त्रियांनी आम्ही माणूस आहोत आणि माणूस म्हणूनच जगणार, त्यासाठी लढा देवून ते साध्य आपण करणारच हे दाखवून दिले आहे. म्हणूनच या सर्व स्त्रियांना मानाचा सलाम!

अशा मैत्रिणींच्या कठोर प्रयत्नांची दखल घेणे म्हणूनच महत्त्वाचे आहे. स्त्रिने ठरविले तर ती 'झाशीची राणी' होऊ शकते, आपल्या कुटूंबाचा आधार बनून त्यांचेही जीवन सुधारु शकते. 'मुलगा वंशाचा दिवा', 'बाईच्या जातीने खाली बघून, मर्यादेत रहावे' ह्या सर्व चुकीच्या चौकटीतील मर्यादा आहेत हेच या स्त्रियांच्या अनुभवातून आपल्याला दिसून येते. समाजात असे कठीण प्रसंग पावलोपावली, क्षणोक्षणी येत असतात. त्याला तोंड कसे द्यावे हे या लेखांतून सर्वांना कळावे, त्यातून स्फूर्ती घेऊन धैर्याने त्याला सामोरे जाता यावे, हिंमत मिळावी यासाठी हा लेखन प्रपंच.

या पुस्तकात लिहिलेल्या सर्व कहाण्या खऱ्या आहेत. सत्यकथा आहेत. सुजाता कुलकर्णी व सरला भावसार वगळता इतरांची नावे त्यांच्या इच्छेनुसार बदलली आहेत.

या कथा आपल्याला आपल्यातील मरगळ झटकायला मदत करतील. आपण त्यांच्या जिद्दीपुढे आपल्या मनावरची धूळ झटकून आशेने पुढे जाऊया. यातून खूप शिकण्यासारखे आहे. त्यांनी त्यांच्या कथांमधून काही प्रश्न उभे केले आहेत. त्यांची उत्तरे शोधण्याचे काम त्यांनी त्यांच्या परीने केले आहे. पण समाज त्यासाठी काही करतोय का? समाज बदलतोय हे खरे पण अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. प्रत्येक आयुष्य जगायचे आहे. स्वत:च्या हाताने घडवायचे आहे. इतरांवर अवलंबून न रहाता स्वत: आपल्याला हवे तसे जगायचे आहे, समाज कसेही वागलो तरी नावे ठेवणारच आहे, स्त्री म्हणून कमी लेखणार आहेच तेव्हा त्याचा बाऊ न करता 'मी स्वत: एक व्यक्ती आहे, मला व्यक्ती म्हणून जगण्याचा अधिकार आहे, हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!' असा निर्धार आपण सर्वांनी करुया. या स्त्रियांच्या कथा आपल्याला पाठबळ देतील.

या सर्व स्त्रियांचे मनापासून आभार, त्यांनी आपले अनुभव मनमोकळेपणे माझ्याशी व्यक्त केले. काहीनी ते स्वत: लिहून दिले. या सर्व कथांचे शब्दांकन व टायपिंग बद्दल राजेश्री मोरे शिंपीची मोलाची मदत झाली. तिची पण मी आभारी आहे. तसेच या पुस्तकाचे सुंदर व अर्थपूर्ण मुखपृष्ठ बनवणारे चैतन्य चव्हाण यांचीही आभारी आहे.

सर्व वाचकांना हे पुस्तक आवडेल व खूप काही शिकायला मिळेल अशी आशा करते.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

डॉ. सुजाता मोरे-चव्हाण.

# अनुक्रमणिका


| क्र. | नाव | पान |
|---|---|---|
| १. | सुजाता | १३ |
| २. | शोभा | २६ |
| ३. | पार्वती | ३० |
| ४. | मंजुषा | ३३ |
| ५. | मधुरीमा | ३७ |
| ६. | सरला | ४१ |
| ७. | सुमन | ४८ |
| ८. | गोदावरी | ५२ |
| ९. | मीना | ५५ |
| १०. | विमल | ५८ |
| ११. | मीनल | ६१ |
| १२. | सविता | ६४ |

## सुजाता कुलकर्णी –

वय ६० च्या आसपास, एका ब्राह्मण मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी.

### दिव्यांग मुलीचा जीवन संघर्ष!



प्रत्येक माणूस आयुष्यात संघर्ष करत असतो. स्वत:ला घडवण्यासाठी प्रत्येकाला वेगवेगळया अडचणींतून व संकटांतून मार्ग काढावा लागतो. पण दिव्यांग व्यक्तींना मात्र जास्त संघर्ष करावा लागतो. शरीराची ताकद, मानसिक उमेद, जिद्द एकत्र एकवटून त्यांना पुढे जावे लागते. सुजाताने हे सर्व अडथळे पार पाडून एक यशस्वी जीवन जगले.

एखाद्या कुटुंबात व्यंग असलेले मुल जन्माला आले किंवा नंतर मुलास दोष निर्माण झाला तर त्या कुटुंबाला मोठ्या संकटातून जावे लागते. अपंगत्व हा एक शाप मानला जातो. अशी व्यक्ती त्या कुटुंबाची जबाबदारी बनते. त्या व्यक्तीचा जन्मभर सांभाळ करावा लागणार ह्या कल्पनेने सुद्धा कुटुंबातील सदस्य घाबरुन जातात. त्यातून ती मुलगी असली तर मग अजूनच काळजी वाढते.

आता अपंग हा शब्द न वापरता दिव्यांग असा शब्द वापरला जातो. इतरांपेक्षा वेगळेपण असणारी ही व्यक्ती. त्या व्यक्तीत शारीरिक-मानसिक दोष निर्माण होतात व त्या दोषांच्या प्रमाणात त्याचे परिणामही बदलतात. पोलिओ हा पूर्वी इलाज न करण्यासारखा आजार मानला जायचा. पोलिओ मुळे पायांवर, पर्यायाने हलनचलनावर (mobility) परिणाम होतो.

सुजाताचे कुटुंब मूळ कर्नाटकातले. आईवडिल  कानडी माध्यमातून एस.एस.सी. पास. वडिल नोकरीच्या निमित्ताने मुंबईत दादरला स्थायिक झाले. वेगवेगळया नोकऱ्या केल्या पण मनाचे समाधान झाले नाही. त्यांनी जे.जे.स्कूल ऑफ आर्टस मधून पदविका घेतली व मेटल बॉक्स कंपनीत आर्टिस्ट म्हणून काम करु लागले. त्यांना त्यांच्या आयुष्याचा सूर गवसला. तिची आई मुंबईला आली ती लग्नानंतरच. इतर भाषा येत नसल्यामुळे कुचंबणा होत होती. पण त्यावर मात करुन मराठी भाषा अवगत केली. सुजाताला एक तिच्यापेक्षा दीड वर्षाने मोठी बहिण आहे. सुजाता दोन वर्षांची होईपर्यंत सर्व ठीक होते. एकदा दोघींना ताप आला. साधा ताप आहे म्हणून दोघींना एकाच पलंगावर झोपवले होते. आईने फॅमिली डॉक्टरांना बोलावले. तपासल्यावर त्यांनी सुजाताचा ताप साधा नसून पोलिओचा असल्याचे निदान केले. मग दोघींना वेगळे झोपवले. ६० वर्षांपूर्वी या आजाराबद्दल फारशी माहिती नव्हती व त्याचं गांभीर्यही नव्हतं. या आजारात काय उपचारपध्दती असते याबद्दल तिचे आईवडिल अनभिज्ञ होते. त्यावेळी  त्यांनी सुजाताचा डावा पाय वाळूच्या पिशव्यांच्या सहाय्याने बांधून ठेवला, तो पाय वाकडा होऊ नये म्हणून.

पहिले तीन आठवडे हा आजार संसर्गजन्य असतो व त्यानंतर त्याची खरी

उपचारपध्दती सुरु होते. डॉक्टरांनी तिला हाजीअली येथील रुग्णालयात जायचा सल्ला दिला. त्याप्रमाणे रोज तिची आई तिला घेऊन हॉस्पिटलमध्ये फिजिओथेरपी साठी जात होती. दररोज दादर ते हाजीअली प्रवास व्हायचा, पण आईची जिद्द/ चिकाटी मजबूत होती. फिजिओथेरपीची उपचार पध्दती संपल्यानंतर तिला नियमित घालण्यासाठी बूट व कॅलिपर दिले. त्याच्या आधाराने ती हिंडू-फिरु लागली. त्यामुळे तिला नॉर्मल मुलींच्या शाळेत प्रवेश मिळाला. तिची बहिण पण त्याच शाळेत असल्याने सुजाताला खूप आधार झाला. मुख्याध्यापिका, शिक्षिका, मैत्रिणी सर्वांची मदत झाली. शाळाही जवळच असल्याने आईवडिलांना चिंता नव्हती.

हळूहळू सुजाताला आपण वेगळे आहोत याची जाणिव होऊ लागली. रोज शाळेचे दप्तर घेऊन जाणे जिकीरीचे झाले. त्यातून वर्ग पण वरच्या मजल्यावर होता. शाळेत अशा मुलींचा वेगळा विचार केला जात नाही. तिला शाळेत पोहचवायला व आणायला एक मोलकरीण येऊ लागली. त्यामुळे तिची आपण दुसऱ्यांवर अवलंबून आहोत या जाणिवेने चिडचिड होऊ लागली. तो सर्व राग ती त्या बाईवर काढत होती. आता मागे वळून बघतांना आपल्या अशा वागण्याचे तिला वाईट वाटते. तिच्या सगळया मैत्रिणी खाली खेळायच्या. पी.टी.च्या तासालापण सुजाता बाजूला बसून रहायची. त्याचं तिला खूप वाईट वाटे. पण तिच्या ह्या भावना शिक्षकांना कधी समजल्या नाहीत. अकरावीत गणित व इंग्लिश साठी क्लास लावला. पण तो क्लास खूप लांब होता. त्यामुळे जाण्यायेण्याची पंचाईत झाली. तिला जास्त चालायची सवय नव्हती. बसने जाणं पण सोईचं नव्हतं. मग शेवटी धीर करुन ती चालण्याची सवय करायला लागली. सुजाताने जिद्दीने चालायचे ठरविले. लांबपर्यंत न कंटाळता ती पायी जायची.

११वी नंतर पुढे काय? चिंता भेडसावू लागली. सुजाताला डॉक्टर व्हायचे होते. रुपारेल कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचे ठरले. तिथले प्राचार्य डॉ.एस.जी.मुदगल तिच्या वडिलांचे मित्र होते. त्यांनी सुजाताला विज्ञान शाखेचा अभ्यास, उभं राहून प्रॅक्टिकल्स झेपणार नाही म्हणून कला शाखेत प्रवेश घेण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे कला शाखेत प्रवेश पक्का झाला.

मानसशास्त्र हा विषय घेऊन तिने बी.ए. केलं तर पुढे आयुष्यात खूप वाटा आहेत असे सांगितले. रुपारेल कॉलेजला जायला दादरहून बस सोयीची होती म्हणून त्या कॉलेजचा विचार केला. पण २-४ महिन्यांतच ती बससेवा बंद झाली. त्यामुळे चारही वर्षं माटुंगा ते दादर अशी पायपीट करायला लागली. त्याचा एक फायदा झाला तो म्हणजे, त्यामुळे भरपूर चालण्याची सवय झाली. केवळ भौतिक सोयींच्या अभावामुळे तिला हवे ते करियर करता आले नाही हे केवढे दुर्भाग्य!

मुलींच्या शाळेत शिक्षण झाल्यामुळे मुलांशी बोलायची सवय नव्हती. सुरक्षित वातावरणात राहिल्यामुळे इतरांमध्ये वावरण्याची पण सवय नव्हती. त्यामुळे सुजाताला तिचा न्यूनगंड त्रास देऊ लागला. तिला वाटायचं,"लोक मला हसतील, माझी टर उडवतील" म्हणून ती सगळयांच्या आधी वर्गात जाऊन बसायची व शेवटी वर्गातून बाहेर पडायची. ती सुरवातीला स्कर्ट, ब्लाऊज, ए लाईन टॉप घालायची. पण आता स्वत:चे पाय दिसतील याची लाज वाटायला लागली. म्हणून घागरा, शर्ट-पॅंट, साडी असा पेहराव घालायला सुरुवात केली. आपले दोष झाकण्याचा तिचा प्रयत्न होता. आपणही इतरांसारखेच आहोत हे तिला दाखवून द्यायचे होते. नंतर तिची एका मुलीशी ओळख झाली. ती सगळयांशी खूप मोकळेपणाने वागायची व सुजाताला ते खूप आवडत होतं. हळूहळू त्यांची मैत्री झाली. मग सुजाता इतर मुलींशीही बोलू लागली. मैत्रिणींच्या सहवासात तिला सुरक्षित वाटत असे. १०-१२ मुला-मुलींचा ग्रुप जमला. ते सगळे खूप छान बोलायचे व छान सांभाळून घ्यायचे. आता ती खूप स्थिरावली व खूप मोकळी झाली.

सुजाताच्या मैत्रीणीने एन.सी.सी. जॉईन केलं. त्या गणवेशात ती खूप आकर्षक दिसायची. पण सुजाताला जाणवलं की, ती हे काही करु शकणार नाही. परत एकदा तिने आपल्या मनाला मुरड घातली. शिक्षणाव्यतिरिक्त काहीतरी करावे म्हणून तिने एन.एस.एस. जॉईन केलं. ती हळूहळू आपल्या कोषातून बाहेर पडली. अंध मुलींच्या शाळेत त्यांना मदत म्हणून आठवड्यातून तीनदा दोन तास जायची. अंध मुलींबरोबर राहिल्याने त्यांच्या अडचणी, भावना समजायला लागल्या. शिक्षण घेण्यासाठी त्यांना किती धडपड करायला लागते याची

कल्पना आली. एक अपंग दुसऱ्या अपंगाच्या अडचणी लवकर समजू शकतो. शिवाय आपल्यापेक्षा अधिक दु:ख भोगणाऱ्या व्यक्ती आहेत हे समजल्यावर आपण आपलेच दोष कुरवाळीत बसणे अयोग्य आहे हेही प्रकर्षाने जाणवले. इथून तिच्या आयुष्यात समाजसेवेचा श्रीगणेशा झाला.

बी.ए. झाल्यानंतर एम.ए. ला प्रवेश घ्यायचा होता. पण मानसशास्त्र ह्या विषयात प्रवेश मिळाला नाही म्हणून समाजशास्त्र ह्या विषयात प्रवेश घेतला व ती पदवी पदरात पाडून घेतली. एम.ए. साठी रोज दादर ते कलिना असा ट्रेनचा प्रवास दोन वर्ष केला. आत्मविश्वास वाढला. एम.ए. झाल्यानंतर एका हॉस्पीटलमध्ये सोशल वर्करची जागा रिकामी होती म्हणून अर्ज केला. त्यावेळेस तिला सांगण्यात आलं की, समाजसेवेची पदवी असणं ह्या नोकरीसाठी आवश्यक आहे. मग तशी पदवी कुठे मिळते त्याचा शोध घेतला. निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क येथे अर्ज केला व तेथे प्रवेश मिळाला. ती पदवी मिळविण्यासाठी खूप फिरावं लागतं याची कल्पना आली व त्यासाठी मानसिक तयारी केली. पदवी मिळविण्यात तिला यश आलं आणि ती आश्वस्त झाली. पदवी मिळाल्यानंतर दोन महिन्यांत लहान मुलांच्या वाडिया हॉस्पीटल मध्ये सोशल वर्करची नोकरी मिळाली. तेथील सहकारी श्रीमती ओबेरॉय, श्रीमती सेहगल, श्रीमती ललीता शहा ह्यांचे तिला मोलाचे सहकार्य मिळाले. ज्या मुलांना नुकताच पोलिओ झाला आहे, अशा मुलांच्या पालकांना समुपदेशन करायचं काम होतं. तिला तिच्या आईवडिलांनी घेतलेल्या परिश्रमांची जाणीव होती. शिवाय आता शास्त्रोक्त शिक्षणही घेतले होते. ती ते काम मन लावून करु लागली.

निर्मला निकेतन मधे समाजसेवेचे प्रशिक्षण घेताना खूप तांत्रिक बाबी शिकवल्या गेल्या. एखादी केस हाताळतांना कुठली कला व कौशल्ये वापरली तर आपल्याला हवा तो परिणाम साधता येतो. उदा.एखाद्या व्यक्तीचं बोलणं लक्षपूर्वक ऐकणे, त्याला योग्य तो मार्ग दाखवणे, त्याला त्याचा निर्णय घेण्यास मदत करणे. एका मार्गदर्शकाची भूमिका पार पाडायची याचे प्रशिक्षण घेतले. त्या सगळ्यांचा उपयोग समस्या सोडवतांना तिला झाला. तिला भेटलेल्या मार्गदर्शकांकडून मिळालेले ज्ञान वापरुन ती निर्णय घेत गेली. तसे तर बरेच समाजसेवक असतात पण साधारण समाजसेवक आणि प्रशिक्षित समाजसेवक दोघांमध्ये खूप

फरक आहे.

ह्या वळणावर सुजाताच्या आईवडिलांना असा विश्वास वाटू लागला की ती आता स्वत:च्या पायांवर उभी राहू शकेल. पण तिच्या भविष्याबद्दल चिंता वाटू लागली. वर संशोधन सुरु झाले. खरंतर सुजातासाठी विवाह ही गौण बाब होती. तिच्या दृष्टीने स्वत:च्या पायावर उभे रहाणे व स्वावलंबी होणे हे एकच उद्दिष्ट होते. वाडिया रुग्णालयातील नोकरी तात्पुरती होती. एक वर्षानंतर म.गांधी रुग्णालयात कायम स्वरुपी नोकरी मिळाली. सुजाताचे आयुष्य नावारुपाला आणण्यात तिथल्या जेष्ठ समाजसेविका श्रीमती विनिता चितळे यांचा खूप मोठा वाटा आहे. TISS मधून डॉ. गीता शहा यांनी M.A. च्या मुलांना व्याख्यान देण्यासाठी आमंत्रण दिले. चितळे मॅडमनी तिला जबरदस्तीने व्याख्यानाला जाण्याचा आग्रह धरला. तिला व्याख्यान देण्याचा अनुभव नव्हता व आत्मविश्वास पण नव्हता. व्याख्यान दिल्यावर मात्र तिला खूप छान प्रतिसाद मिळाला आणि त्यानंतर ती नियमितपणे TISS व निर्मला निकेतन येथे व्याख्यानाला जात होती. एम.ए.च्या विद्यार्थ्यांना field work training देण्यासाठी तिची निवड झाली.

एरव्ही समाजात अशी व्यंग असलेली मुलगी म्हणजे आईवडिलांवर बोजा अशी भावना दिसून येते. पण सुजाता मात्र स्वत:च्या पायावर उभी राहून कमावत होती. कोणावर अवलंबून रहावे लागू नये असे तिचे प्रयत्न होते. नोकरीच्या काळात ती बऱ्याच व्यक्तींना भेटली. खूप काही शिकली. पुस्तकी ज्ञानापेक्षा जीवनाचे ज्ञान हे लोकांबरोबर काम करतांना मिळाले. नेहमीच सर्वांनी मान दिला असे नाही पण बऱ्याचदा मदत करणारे भेटले. एक मात्र खरे की कोणी दया दाखवल्यावर राग यायचा. ती तिच्या पायावर उभी होती. सर्वांसारखे काम करत होती. सहसहानुभूती जरुर हवी पण सहानुभूती नको. Empathy हवी पण sympathy नको. दिव्यांगांना समावून घेण्याचे प्रयत्न व्हावयास हवेत. त्यासाठी भौतिक गरजांचा विचार केला जायला हवा. एखाद्या ठिकाणी जायचे असेल तर तेथे पायऱ्या कशा असतील, धरायला दांडा असेल का? इत्यादी बाबींचा त्यांना विचार करावा लागतो. शारीरिक मर्यादांमुळे काहीवेळा हवे तेथे जाणे शक्य होत नाही. आज समाजात सर्वांनी या गोष्टींचा विचार करायलाच हवा. सर्वांसोबत त्यांना जगता यावे ह्याचे प्रयत्न व्हायला हवेत.

हॉस्पीटलमधे काम करत असतांना कुमारी मातांच्या पण केसेस हाताळाव्या लागत. त्या समस्येचं गांभीर्य तिला तेव्हा कळलं. एका संस्थेने एक प्रथितयश sexologist डॉ. विठ्ठल प्रभू यांचं व्याख्यान मुलामुलींसाठी आयोजित केलं होतं. तेथे हजर रहाण्यासाठी सुजाता गेली. तिने स्वत: त्या तज्ञांची ओळख करुन घेतली व स्वत:च्या कामाची कल्पना दिली. त्यांनी तिला सविस्तर चर्चेसाठी घरी बोलावले. त्यानंतर कुठल्याही व्याख्यानाचं आमंत्रण आलं की ते तिला बरोबर घेऊन जात. शरीरशास्त्राबद्दल ते बोलत. समाजशास्त्र व मानसशास्त्राबद्दल ती विवेचन करत असे. खूप लोकांच्या ओळखी झाल्या. तिची भीड चेपून गेली. अविवाहित असून सुध्दा ती ह्या विषयावर बोलत असे याचे कौतुक होत असे.

सात वर्षे हॉस्पीटलमध्ये काम केल्यानंतर अजून चांगली नोकरी शोधण्याचा विचार तिने केला. त्याचवेळी कुटुंब न्यायालयाची स्थापना होणार होती. म्हणून विवाह समुपदेशकाच्या नियुक्त्या होणार होत्या. तिथे सुजाताने अर्ज केला. तिला सांगण्यात अभिमान वाटतो कि जेष्ठता यादीत तिचं नाव पहिलं होतं. न्यायालयात प्रथम वर्गातील अधिकारी म्हणून स्वत:च्या हिमतीवर नोकरी मिळाली. श्रीमती चितळे व श्रीमती मिनाक्षी आपटे ह्यांच्या सल्ल्यामुळे तिला हे साध्य करता आले.

भारतात अशी एक संघटना आहे ज्यांच्यामार्फत भारतातील विद्यार्थी परदेशात जाऊन तेथील रहाणीमान, जीवनमान व विचारप्रणाली शिकून घेतात व तसेच इतर देशातील लोक भारतात येतात. अमेरीकेत जाण्यासाठी सुजाताने अर्ज केला. भारतात एकूण १० जणांची निवड झाली त्यात तिचा समावेश होता. तिला नवीन नोकरीबद्दल पण आतुरता होती पण अमेरीकेची संधी गमवायची नव्हती. ती व्दिधा मनस्थितीत होती. पण माननीय उच्च न्यायालयाच्या सौजन्याने तिची नवीन नोकरी पण सुरक्षित राहिली व अमेरीकेची संधी पण साधली. त्यामुळे तिला आभाळ ठेंगणे झाले. ती साडेचार महिने IOWA USA येथे राहून, शिकून आली. जबरदस्त आत्मविश्वास वाढला. तिच्या विचार करण्याच्या प्रक्रियेत आमूलाग्र बदल झाला.

तेथील वास्तव्यात वेगवेगळया संस्थांना भेटी दिल्या. वेगवेगळया कार्यक्रमात भाग

घेतला. तिथल्या लोकांना भारतातील विविध उपक्रमांची माहिती दिली. तिथल्या टी.व्ही.वर मुलाखत पण झाली. IOWA तील ग्रुपला एक विषय दिला होता. त्यावर अभ्यास करुन शोधनिबंध तयार केला. तो सादर केला. वॉशिंग्टन येथे ३०० लोक वेगवेगळया देशातून एकत्र आले होते. त्यांना वेगवेगळया ग्रुपमध्ये विभागले व प्रत्येकाला तीन दिवसात एकमेकांशी बोलून पेपर तयार करायला सांगितला होता. तेथे आशियातील देशांचे प्रतिनिधित्व सुजाताने केले व सगळयांसमोर तो पेपर सादर केला.

हॉस्पीटलमध्ये काम करत असतांना अपंग संजीवनी ह्या संस्थेशी सुजाताची ओळख झाली. ती संस्था अपंगांचे विवाह जमविण्याचे काम करत होती. सुजाता ऑफिस सुटल्यानंतर तेथे पत्रव्यवहार सांभाळणे, मेळावे भरवणे  अशी इतर कामे करत होती. त्या दरम्यान तिची एका हसतमुख मुलाशी ओळख झाली. त्याचे नाव श्री.रविंद्र कुलकर्णी. पुढे त्या दोघांची चांगली मैत्री झाली. काही वर्षांनी ती त्यांच्याशी विवाहबध्द झाली. त्यांना दोन्ही पायांना पोलिओ झाला होता. पण बूट व काठ्यांच्या मदतीने ते सगळी कामे करत असत. त्यांनी सुजाताला सर्वार्थाने साथ दिली. स्वत: अपंग असल्यामुळे सुजाताच्या अडचणी त्यांना न सांगता कळायच्या. स्वयंपाक करण्यापासून मुलाला सांभाळण्यापर्यंत सगळया कामात त्यांचा आनंदाने सहभाग होता. आपल्या सासू-सासऱ्यांचा तिने वृध्दापकाळात आनंदाने सांभाळ केला.

सुजाताने कुटुंब न्यायालयात प्रमुख विवाह समुपदेशक म्हणून पण काम केलं. महाराष्ट्रातील कुटुंब न्यायालयातील विवाह समुपदेशकांच्या संघटनेचे अध्यक्षपद चार वर्षे भूषविले. २६ वर्षे नोकरी करुन आता ती निवृत्त जीवन जगत आहे.

ह्या संघर्षमयी प्रवासात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की दिव्यांग व्यक्तीशी मैत्री करणे वेगळे व दिव्यांग व्यक्तीला जोडीदार म्हणून निवडणं ह्यात खूप फरक आहे. जोपर्यंत दिव्यांग व्यक्तीच्या सहवासात रहात नाही तोपर्यंत त्यांना येणाऱ्या अडचणींची कल्पना येत नाही. प्रत्येक पावलापावलावर ठेच लागते. लोकांचा दिव्यांग व्यक्तीकडे बघण्याचा दृष्टीकोन खूप वेगळा असतो. त्यांना कोणी दया दाखवू नका. त्यांच्या वेदना समजून घ्या व आनंदाने

जगू द्या.

सुजाताला रोज कुर्ला स्टेशनजवळ रिक्षा पकडतांना खूप परिश्रम करावे लागत. त्यातही बरोबर येऊन मदत करण्यापेक्षा तिच्या निमित्ताने आपल्यालापण रिक्षा मिळेल म्हणून जवळ येणारेच जास्त. अशा स्वार्थी लोकांकडे बघितलं की मन उद्विग्न होतं. पण ह्याच प्रवासात तिला अनेक चांगले लोकही भेटले त्यामुळे जगण्याची उमेद प्रज्वलित राहिली.

शरीर व मनाने धडधाकट असणे ही केवढी प्रचंड श्रीमंती आहे हे केवळ दिव्यांग व्यक्तीच समजू शकते. स्टेशनचे पूल खूप ठिकाणी त्यांच्यासाठी गैरसोयींचे आहेत. ह्याचा अनुभव सुजाताने कल्याण स्टेशनवर घेतला. मग ह्यावर काम करण्यासाठी सह्यांची मोहिम हाती घेतली. एक दिवस प्लॅटफॉर्मवर उभे राहून लोकांना समजावून सह्या घेण्याचा प्रयत्न केला. ती सगळयांना समजावयाची कि जसा मला त्रास होतो तसा तुमच्या घरच्यांनाही होऊ शकतो. त्यावर लोकांच्या प्रतिक्रिया होत्या, ‘आमच्या घरी कोणी दिव्यांग नाही तर आम्ही का सह्या देऊ?’ साध्या पडण्याचं निमित्त होऊन एखादा अवयव जायबंदी झाला की त्या क्षणी शारीरिक ऐश्वर्याची किंमत माणसाला कळते.

सुजाताकडे मुलाला सांभाळायला एक बाई होती. कुठेही प्रवास करताना तिची मदत लागायची मुलाला सांभाळायला. तर ती त्यांच्यापासून दूर उभी रहायची. तिला त्यांची लाज वाटत असे आणि उलट ती त्यांच्या दिव्यांग असण्याचं भांडवल करत होती. जे त्या दोघांनी कधीही केलं नाही.

तिचा मुलगा तीन महिन्यांचा होता तेव्हापासून एक बाई तिच्याकडे मुलाला सांभाळायला होती. २४ तास त्यांच्याकडे रहायचे असे ठरले होते. सुजाता मुलाला कडेवर घेऊन चालू शकत नव्हती. तिची बाळंतपणाची रजा संपल्यावर बाईने ती २४ तास येऊ शकणार नसल्याचे सांगितले. सकाळी श्री. कुलकर्णी मुलाला अंघोळ घालायचे पण त्याला बाथरुम बाहेर आणायचे कसे? सुजाता कसेबसे त्याला घेऊन यायची व तयार करायची. ८:१५ ला बाई आल्यावर सुजाता ऑफिससाठी निघायची. संध्याकाळी ती घरी आली की बाई

जायची. मग ती मुलाजवळ श्री.कुलकर्णी येईपर्यंत बसायची. मुलाला घेऊन खाली बसले असतांना बेल वाजली की दार उघडायचे म्हणजे मुलाला खाली ठेऊन उठायचे अशी सर्कस होत होती.

मुलगा चालायला लागल्यावर थोडं सोपं झालं. तो वयाच्या मानाने खूप समंजस होता. कधीही रस्त्यात हात सोडून पळाला नाही. बाबांच्या काठ्या पकडून शहाण्या मुलासारखा चालायचा. सुजाताला दिवस गेले तेव्हा तिला खूप टेन्शन आलं की आता बाळाला वाढवायचं कसं? पण श्री कुलकर्णी खूप सकारात्मक विचार करत. त्यांनी तिला मी आहे ना होईल सर्व ठिक असा धीर दिला.

तिला वाटते कि त्या दोघांच्या अडचणी बघून तिचा मुलगा अवेळी समंजस झाला असावा. खूप लवकर त्याला त्याच्या जबाबदारीची जाणिव झाली. त्याला त्यांनी नेहमी उत्तेजनच दिले. लहान असताना त्याला कुठेही न्यायचे म्हणजे कोणालातरी बोलवावे लागे. त्याचे ओले कपडे बदलतांना पण इतरांपेक्षा आपल्याला खूप वेळ लागतो म्हणून चिडचिड व्हायची तिची. कुठेही जायचं तर लवकर निघावं लागे. असं असूनही ती २६ वर्षात कधी कामावर उशीरा गेली नाही.

अजूनही लहानपणीचा न्यूनगंड डोकं वर काढतो व तिला कुठल्याही समारंभात पुढे येण्यास परावृत्त करतो. ती लहान असतांना सगळयांना हिचं कसं होईल ही चिंता होती. नंतर स्वत:च्या पायावर उभी राहिल्यावर हिचं लग्न कसं होईल ही काळजी होती. तेही स्वत:च ठरवल्यावर सर्व आश्वस्त झाले.

बालपण मुंबईत गेल्यामुळे बस व ट्रेनचा प्रवास ती बिनधास्त करायची. गर्दीच्या वेळेत चढतांना त्रास व्हायचा.

प्रवासात मोठी अडचण असायची ती म्हणजे प्रसाधनगृहाची. तेव्हा कमोड फारसे वापरात नव्हते. खाली बसायचे व उठायचे म्हणजे दिव्य होते. त्यामुळे अगदी बेसिक बाबतींतही संघर्ष करावा लागत होता. बाथरुम ओले असेल तर पाय घसरण्याची भीती असते.

सार्वजनिक ठिकाणी तर याबद्दल काही बोलायलाच नको. माणूस एवढाही विचार करु शकत नाही का दुसऱ्याचा?

घरातही तिने तिच्या सोयीप्रमाणे वस्तू हाताला लागतील अशा ठेवल्या होत्या. उंच ठेवल्या तर काढतांना कोणाचीतरी मदत लागायची. तिला सात वर्षात तीनदा फ्रॅक्चर्स झाली. दिवसभरातील साध्यासाध्या गोष्टीही खूप काळजीने कराव्या लागतात. गरम भांडे हातात घेऊन चालणे शक्य होत नाही. तिची आई ८४ वर्षांची आहे. तिला सांभाळतांना अडचणी येतात. तिला नुसते वाढून द्यायचे तर तेही सोपे जात नाही. मग तिने जेवणाची ट्रॉली आणली. त्यामुळे थोडे सोपे झाले. घरात कोणी नसतांना इलेक्ट्रीकची बटने बंद करायला आता तिने प्रत्येक खोलीत काठी ठेवली आहे.

कोणाच्या घरी गेलं तर बूट काढता येत नाहीत. त्यामुळे कधी बाहेरच बसावे लागते. स्वयंपाकघरात जाता येत नाही. पूजेच्या ठिकाणी जाता येत नाही.

सार्वजनिक ठिकाणी सौंदर्यदृष्टी ठेवून इमारतीची रचना केलेली असते. पण दिव्यांग व्यक्तीच्या समस्यांचा विचारच केलेला नसतो. पायऱ्यांना धरायला काही नसते. चकचकीत फरशा असतात. पाय घसरण्याची भिती असते. याबाबतीत ती जेव्हा परदेशात फिरली तेव्हा तिला कुठलीच अडचण आली नाही. रस्ता ओलांडतांना पण असुरक्षित वाटल नाही तिथे. पण इथे तिला खूप धोक्याचं वाटतं. साधं सामान आणायचं तरी कमी पायऱ्या असलेलं, सहज चढता येईल असं दुकान शोधावं लागे तिला.

तिची आई हॉस्पीटल मध्ये असतांना ६ दिवस तिला तिच्याबरोबर रहायला लागलं. तिथे पण टॉयलेट दोन फूट उंचावर होतं. निदान हॉस्पीटल सारख्या ठिकाणी तरी या गोष्टींचा विचार व्हायला हवा.

सर्वच सार्वजनिक ठिकाणी या सोयी असायला हव्यात. नाहीतर दिव्यांगांना अजून

न्यूनगंड येतो. मन उदास व उव्दिग्न होतं. लग्नसमारंभात स्टेज उंच असते. तिथे पायऱ्या डगमग करतात. चढतांना भीती वाटते. बुफे जेवण असेल तर हातात ताट घेवून जेवणे मुश्किल होते. मग बाहेर हॉटेलमध्ये जाऊन किंवा घरी जाऊन जेवावे  असे वाटते. ह्या सर्वांमुळे खूप मनस्ताप होतो.

दिव्यांग व्यक्ती दुर्बल आहे म्हणून कुठल्याही हिंसाचाराला प्रतिकार करु शकत नाही. याचा फायदा घेणारे पण ह्या समाजात उजळ माथ्याने वावरत आहेत.

दिव्यांग स्त्री व दिव्यांग पुरुष यांच्याकडे बघण्याच्या दृष्टीकोनातही फरक आहे. दिव्यांग स्त्री पडली तर पटकन कोणी मदतीला येत नाही. घरातही दिव्यांग पुरुषांना दिव्यांग स्त्री पेक्षा जास्त मान मिळतो. एकूणच समाज स्त्रियांना कमी लेखतो, दुय्यम समजतो; मग त्यातून ती दिव्यांग असेल तर त्याची तीव्रता दुप्पट होते. ती दिव्यांग असली तरी हिंसाचारालाही तिला सामोरे जावेच लागते.

सुजाताशी बोलताना तिच्या मनाच्या कोपऱ्यात काही सुप्त इच्छा राहून गेलेल्या तिने व्यक्त केल्या -

उंच टाचांच्या चपला घालून टेचात नाचायला मिळेल का कधी?
जीन्स, टी-शर्ट घालून हाय-हॅलो करत ड्रमबीटस्वर नाचायला मिळेल का कधी?
पांढरा शर्ट व शॉर्टस घालून ऐटीत खेळायला मिळेल का कधी?
धावत धावत पायऱ्या टेचात चढायला मिळतील का कधी?
लोकांच्या नजरेतला भाव बदलेल का कधी?
लोकांच्या कृतीत, वागण्यात बदल होईल का कधी?
अपुऱ्या राहिलेल्या इच्छा पूर्ण होतील का कधी?

आज मागे वळून बघतांना सुजाता हे नमूद करते कि, तिला स्वावलंबी करण्यात आईवडिलांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी तिला कधी एकटं राहू दिलं नाही. ह्या सगळया संघर्षात खूप चांगले अधिकारी, सहकारी, मित्र-मैत्रिणी, बहिण-मेव्हणे यांचा सहभाग खूप

मोलाचा आहे. त्यांच्याशिवाय तिला हे साध्य होऊ शकलं नसतं. आज ती समाधानी आहे. तिने तिच्या अपंगत्वावर मात केली. याचा तिला सार्थ अभिमान आहे. कुठल्याही सवलतींचा तिने कधी गैरफायदा घेतला नाही.

आता एकच खंत आहे कि, निवृत्तीनंतरचे जीवन उपभोगण्यासाठी जोडीदाराची साथ नाही. तिला वाटते तो असता तर अजूनही खूप समाजसेवा केली असती. मुलाला एक उत्तम माणूस म्हणून घडविल्याचा तिला आनंद व अभिमान आहे. मुलालाही आईवडिलांच्या संघर्षाची जाणीव आहे, समाजाचे भान आहे.

समाजाकडून सहसहानुभूती व सहकार्य लाभले तर सुजातासारख्या व्यक्ती त्यांच्या उणेपणावर मात करुन त्यांच्यातले वैशिष्ट्य जोपासू शकतील. स्वत:तील गुण पहावेत; दोष/अवगुण/ कमतरता तर असणारच पण त्यांच्यावर मात करावी अशी प्रेरणा सुजाताकडून आपण घ्यावी असे वाटते. समाज दिव्यांग व्यक्तींना समजून घेण्यात कमी पडतोय हे मात्र खरं!

हा सगळा जीवनप्रवास वाचल्यावर सामान्य जनतेच्या विचारसरणीत जरा जरी फरक पडला तरी आपण बरंच काही साध्य केलं असं म्हणावं लागेल. त्यासाठी जनजागृती आवश्यक आहे.

ravisujuabhi@gmail.com हा सुजाताचा संपर्क आहे. कोणाला अधिक जाणून घ्यायचे असेल तर यावर संपर्क करावा.

# शोभाताई

५०-५५ वर्षांपूर्वीचा काळ. मुलींनी अविवाहित राहून एकट्याने रहाणं म्हणजे फार कठिण असण्याचा काळ. त्याकाळी शोभाताईंनी अविवाहित राहून आपल्या आईवडिलांना सांभाळण्याचा निश्चय केला.

मुंबईतल्या गोरेगाव या उपनगरात त्यांचे घर होते. सुशिक्षित उच्च मध्यमवर्गीय लोकांची वस्ती होती. शोभाताईंना वाटले आपण इथे आरामात राहू शकू. त्या अभ्यासात हुशार होत्या. ग्रॅज्युएट झाल्यावर त्यांना मुंबई विद्यापीठात नोकरी मिळाली. शोभाताईंना स्वत:च्या पायावर उभे राहिल्याचा आनंद झाला. बहिणीचे लग्न झाले. ती तिच्या संसारात मग्न झाली. मुंबईतच असल्याने अधूनमधून नवऱ्याबरोबर भेटायला यायची. भाऊ पण शिकून परदेशात गेला. तिथेच लग्न करुन स्थायिक झाला. शोभाताईंना सर्व जण लग्नासाठी मागे लागायचे. पण त्या त्यांच्या निर्णयावर ठाम होत्या. त्यांना लग्न-संसार यांची आवड नव्हती. उगीच मनाविरुद्ध वागणे त्यांना जमले नसते. म्हणून आई-वडिलांबरोबर तिथेच राहून त्यांची सेवा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता.

शहरात राहूनही लोकांच्या नजरा त्यांना एकच प्रश्न विचारायच्या - का? का तू अविवाहित आहेस? शोभाताईंना ते कधीकधी असह्य होत असे. पण त्या त्यांच्या आयुष्यात रमल्या होत्या.

लोक शंका घेत .. लग्न जमलेच नसेल... काहीतरी काळंबेरं असेल... वडिलांच्या घरावर डोळा असेल... एक ना अनेक. आजूबाजूचेच नव्हे तर त्यांचे सगेसोयरे, मैत्रिणी, ऑफिसमधले कलिग्स सर्वांच्या नजरा हाच प्रश्न त्यांना विचारत असायच्या. सुरुवातीला त्या आपले मत, आपला निर्णय समोरच्याला समजवायच्या पण हळूहळू त्यांच्या लक्षात येऊ लागलं की त्याचंही लोकं हसू करतात, वेगळे अर्थ काढतात. मग त्या सरळ दुर्लक्ष करु लागल्या. पण त्यामुळे त्यांना सोबत नसायची. सण, लग्न कार्य, हळदी-कुंकू, सत्यनारायण अशा कोणत्याच प्रसंगी त्यांना कोणी बोलावत नसे आणि त्याही तिथे जाण्याचे टाळायच्या.

आज त्यांना वाटंतय की, लग्न न करण्याच्या त्यांच्या निर्णयामुळे त्यांना आयुष्यभर एकटीनेच सर्व भार पेलावा लागला. वडिलांच्या निधनानंतर आई आजारी पडली. अंथरुणाला खिळली होती. तिची सेवा केली. काही वर्षांनी आईही गेली. आता त्या अगदीच एकट्या झाल्या. निवृत्तीनंतर आपले घर, देऊळ यात रमल्या. त्यांच्या मनात असाही विचार येतो की, जर लग्न केले असते तर खरोखरच त्यांना समजून घेणारा नवरा मिळाला असताच ह्याची खात्री नव्हतीच की. लग्न करुनही एकटेपण संपले असते असे नाही. उलटपक्षी त्यांना आपल्या आईवडिलांची सेवा करणे शक्य झाले असते का? म्हणजे लग्न न करण्याचा त्यांच्या निर्णय त्यांना आजही योग्य वाटतोय.

शोभाताईंचा समाजाला एकच प्रश्न होता, पुरुष अविवाहित राहून आपले जीवन सुखाने जगू शकतो मग स्त्री का नाही? का नाही ती तिचे आयुष्य तिच्या मनाप्रमाणे जगू शकत?

स्त्री ही खरच एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगू शकते का? लहानपणी वडिलांच्या दबावात, लग्नानंतर नवऱ्याच्या नंतर मुलांच्या धाकात. अशा पुरुषांच्या दबावाखाली रहाणे हेच तिचे आयुष्य. मग ती कोणत्याही जातीची असो, कोणत्याही वर्गातली असो, शिक्षित असो वा अशिक्षित, कमावती असो किंवा नसो. शिक्षणामुळे ती नोकरी करु शकते, कमवते व स्वत:च्या पायावर उभी रहाते. पण ह्या सर्वात तिची स्वत:ची अशी विचारसरणी तयार होते. त्याकडे आपण जाणून-बुजून कानाडोळा करतो, तिला शिंग फुटली असे मानतो. बाईच्या जातीने लहानपणापासूनच संसार करण्यासाठी हवे ते शिकून घ्यावे. जसे की घरकाम, स्वयंपाक इत्यादी. अगदी लहान असतांना खेळ पण भातुकलीचे खेळायचे ज्यात पुन्हा स्वयंपाक असतोच. लग्न होऊन सासरी जायचे व तिथल्या सर्वांची मने जिंकायची म्हणजे काय तर त्या घरात राबायचे, आपल्या इच्छा-आकांक्षांना वर येऊ द्यायचे नाही. आदर्श सून बनून रहायचे. नंतर म्हातारपणी मुले सांगतील तिथे रहायचे. सांगतील, देतील ते खायचे, तसे वागायचे. स्त्रिला स्वतंत्र व्यक्तिमत्व नसते का? एखादीने या नियमांचे पालन नाही केले तर?

ती बंडखोर ठरते. कोणी तिला समजूनही घेत नाही व सामावूनही घेत नाही. मग त्या बंडखोर(?) स्त्रिला आपल्या जीवनात खूप संघर्षांना तोंड द्यावे लागते. जणू काही समाज त्यांना सांगतो कि तुम्ही आमच्या सांगण्याप्रमाणे नाही वागत मग भोगा शिक्षा तुमच्या वागणूकीची. कणखरपणे अशा प्रकारे लढा देणाऱ्या, खंबीरपणे आपले जीवन जगणाऱ्या स्त्रिया कमी आढळतात.

'आदर्श माता', 'आदर्श स्त्री', 'आदर्श पत्नी', 'आदर्श मुलगी', 'आदर्श वहिनी' अशा चौकटी समाजाने निर्माण करुन ठेवल्या आहेत. स्त्रीच्या वागण्याला वेगवेगळया फूटपट्ट्या लावून त्यांचे मापन करुन ह्या 'आदर्श', 'चांगली' (Good Woman) ठरते का हे समाज सतत ठरवत असतो. कुटुंबात तसेच जातीत शिवाय समाजात तिच्या वर्तणूकीचे मूल्यमापन चालूच असते. आणि ह्या परीक्षेत तिने उत्तमरित्या गूण मिळवावेत ह्यासाठी सतत तिच्या मनावर 'चांगली' बनण्याचे दडपण निर्माण केले जाते. चांगले-वाईट ठरवण्याचा हक्क तिच्याकडे कधी दिला जात नाही.

शोभाताई आपल्या मनाप्रमाणे आयुष्य जगत होत्या. कोणालाही त्यांच्याकडून काही त्रास नव्हता. पण तरीही समाजाने त्यांना वाळीत टाकल्यासारखेच होते. दु:ख तर या गोष्टीचे वाटते की असे करण्यात समाजातील स्त्रियाही कमी नाहीत. त्याही त्यांच्या परीने चाकोरी बाहेर पडू पहाणाऱ्या स्त्रियांना मदत करण्याऐवजी त्यांना त्रास कसा होईल हेच पहात असतात. खरं तर एक स्त्री म्हणून तरी त्यानी जाणिव ठेवायला हवी. समजून घ्यायला हवे. नाही का?

Unmarried by Choice (स्वत:च्या इच्छेनुसार अविवाहित रहाणे) ही movement आता सुरु झाली आहे. हे आशादायक आहे. ह्यामुळे अशा व्यक्तींना ह्या ग्रुपकडून support मिळू शकतो.

आजही एकट्या स्त्रिला (विशेषत: अविवाहित स्त्रिला) भाड्याने घर मिळणे फार

कठीण झाले आहे. एकवेळ विधवा व घटस्फोटीत स्त्रिला स्वीकारले जाते पण अविवाहित स्त्री कडे पहाण्याचा दृष्टीकोन निकोप नाहीये. आज ही परिस्थिती आहे तर शोभाताईंच्या काळात त्यांना हे किती कठीण गेले असेल?

मुळात स्त्रियांचे प्रश्न हे फक्त त्याचे प्रश्न आहेत का? खरंतर हे समाजाचे प्रश्न आहेत. समाजाने निर्माण केलेले प्रश्न आहेत. स्त्री एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जर समाजाने तिच्याकडे पाहिले तर एकूणच समाजातल्या  स्त्री जीवनाचे चित्र पालटलेले दिसेल.

# पार्वतीबाई

पार्वतीबाई - वय ५० च्या आसपास. आज एका फ्लॅटमध्ये सुखाने रहातात. पण हे सुख लाभण्यासाठी आयुष्याने खूप काही करुन घेतलंय त्यांच्याकडून.

लवकर झालेलं लग्न... एकापाठी एक ३ मुलींचा जन्म... नवरा दारुडा व बेकार! वय अवघे २०च्या आसपास. ३ मुलींना वाढवायचं तर हाती कमाई तर हवी. मग त्यांनी घरकामांना सुरुवात केली. स्वत: कमावून घरखर्च करु लागल्या. नवरा मात्र ऐतखाऊ आणि आळशीच राहिला. दारुसाठी किंवा कोणत्याही कारणासाठी मारहाण तर रोजचीच होती. पार्वतीबाई रोजच्या मारहाणीला कंटाळून गेल्या. यातून बाहेर कसे पडता येईल यासाठी त्या कुटुंब न्यायालयात मदतीसाठी गेल्या. त्यांनी वेगळे रहाण्याचे ठरविले.

पार्वतीबाईंनी मग दुसरीकडे घर भाड्याने घेतले आणि तिथे आपल्या मुलींसह राहू लागल्या. आपल्या हिंमतीवर त्यांनी मुलींना शाळेत घातले. हळूहळू मुली मोठ्या होत होत्या. मोठी मुलगी बऱ्याचवेळा वडिलांसोबत रहायची. तिला वडिलांचा लळा होता. त्यांचा सांभाळ तिने केला. ती ग्रॅज्युएट झाली. नोकरीला लागली. तिने तिचा प्रेमविवाह ठरविला. घरी सांगितले. वडिलांचा विरोध नव्हता. पार्वतीबाईंनी पण मुलीच्या ईच्छेचा स्विकार केला व तिचे लग्न लावून दिले. ती तिच्या सासरी गेली. आता २ मुली आणि पार्वतीबाई एकत्र रहात होत्या.

सर्व थोडे सुरळीत झाले आणि त्यांना रमेश भेटला. रमेश ग्रॅज्युएट होता. घरची परिस्थिती मध्यमवर्गीय होती. रमेशला समाजसेवा करण्याची आवड होती. तो त्यातच मग्न असायचा. किडुकमिडुक वस्तू विकून थोडेफार पैसे मिळवायचा व तेही समाजासाठी वापरायचा. याच समाजसेवेच्या आवडीतून दोघांची भेट झाली. वरचेवर दोघे भेटत होते. हळूहळू त्याच्या लक्षात आलं 'आपण पार्वतीमध्ये गुंतलो आहोत'. त्याने लग्नाची मागणी घातली. पार्वतीबाईही एकटेपणाला कंटाळल्या होत्या. त्यांनी होकार दिला. पार्वतीबाई

रमेशपेक्षा ३-४ वर्षांनी मोठ्या होत्या. त्यांना ३ मुलीही होत्या यामुळे रमेशच्या घरच्यांचा लग्नाला विरोध होता. मग रमेश लग्न झाल्यावर पार्वतीबाईंच्या घरी राहू लागला. पार्वतीबाईंनी रमेशला पुढे शिकायला प्रवृत्त केले. तो वकिल झाला. समाजाचा / घरच्यांचा विरोध पत्करुन पार्वतीबाईंनी स्वत:च्या मनाचे ऐकले. दोघांचा संसार सुरु झाला. तिच्या मोठ्या मुलीनेही स्वत:च्या मनाचे ऐकून आपल्या मनाप्रमाणे लग्न केले.

दुसरी मुलगी शिकली आणि तीही वकिल झाली. तिसरी मुलगी पण ग्रॅज्युएट झाली आणि नोकरी करते. आता दुसऱ्या मुलीचे लग्न ठरले आहे. पार्वतीबाईंनी तिच्या सासरच्यांना त्यांच्या आयुष्याची पूर्ण कल्पना दिली आहे. काहीही न लपवता घटस्फोट, दुसरे लग्न या सर्व बाबी त्यांना सांगून मगच लग्न ठरविले आहे.

परिस्थिती थोडी सुधारल्याने आता त्यांनी फ्लॅट घेतला व त्यात तिघे रहातात.

सर्व सुरळीत झाले पण आता परत तिचे वडील एकटे पडले. त्यांनी परत पार्वतीबाईंकडे यायला सुरुवात केली. त्यांच्याकडे पैसे मागू लागले. रमेश त्यांना घरात उभा करुन घेत नसे. त्याने तिथे येऊ नये म्हणून कोर्टाची तशी ऑर्डर घेतली. वेगळे झाल्यावरही नवऱ्याचे वर्चस्व संपले नव्हते. त्यामुळेच 'मी नवरा आहे तिचा. मला हवे तसे मी तिला वागवेन." अशी त्याची वागणूक होती. पोलिस तक्रार घेण्यास नकार देत होते. त्यांच्या मते हे नवरा-बायकोचे घरगुती भांडण होते. अशा प्रसंगी पार्वतीबाईंना समुपदेशकांची आठवण झाली. त्यांनी त्यांच्याशी संपर्क साधला.

तिच्या कायदेशीर अधिकारांची जाणिव समुपदेशनातून तिला झाली. बायको म्हणजे नवऱ्याची मालकी हक्काची वस्तू नसते. उलट बायकोला पोसण्याची, तिला सुखात ठेवण्याची जबाबदारी नवऱ्याची असते. कायदेशीर रित्या ती नवऱ्याकडून पोटगी मागू शकत होती. तिने मग पोटगीचा दावा दाखल केला.

कोर्टात केस दाखल झाल्यावर त्याची सूचना प्रतिवादीला दिली जाते व त्याला कोर्टात बोलावले जाते. कोर्टाच्या पहिल्या तारखेला दोन्ही पक्षकारांना विवाहसमुपदेशकाकडे पाठविले जाते. पार्वतीचा नवरा पहिल्या तारखेला हजर राहिला. समुपदेशकाने त्याचे म्हणणे ऐकून घेतले. त्यालापण त्याच्या समस्यांची जाणिव झाली. त्याबरोबरच त्याची कर्तव्येही समजली. दोघांच्या एकत्रितपणे बैठका झाल्या. चर्चा झाली. शेवटी त्याच्या मते तो पोटगी देऊ शकणार नाही असे त्याने व्यक्त केले. पार्वतीला त्याच्यापासून पोटगी पेक्षाही त्रास होऊ नये अशी अपेक्षा होती. पोटगी न घेता घटस्फोट द्यायला तो तयार झाला. दोघांनी मग संमतीने घटस्फोट घेतला. मुलींचा ताबा आईकडे ठेवायचे ठरले.

पार्वतीबाई विचारतात, 'मी असे काय केले होते म्हणून आयुष्यात मला एवढ्या खस्ता खाव्या लागल्या?' एकीकडे त्यांना समाधानही आहे की सचोटीने, प्रामाणिकपणे वागून त्यांनी मुलींना मोठे केले. स्वत:च्या पायांवर उभे केले. मुलींनीही आईची जाणिव ठेवली. आता यापुढे तरी त्या सुखाने रहातील.

समाजात अशा खूप पार्वती आहेत. पण सर्वांना समुपदेशकांची मदत मिळत नाही. सर्वच आपल्या ताकदीवर जीवन जगू शकत नाहीत. बायका घाबरुन अबलाच रहातात त्यामुळेच पुरुषांना वर्चस्व गाजविणे शक्य होते. हे समाज जाणून आहे. स्त्रिला शिकून, आपल्या पायावर उभे राहून एक व्यक्ती म्हणून जीवन जगण्याचा हक्क आपल्या संविधानाने दिला आहे पण पुरुषप्रधान संस्कृती त्यांच्या स्वार्थासाठी हा हक्क स्त्रियांना नाकारतो आहे. पण असे खूप दिवस चालणार नाही हेच पार्वतीबाईंसारख्या स्त्रियांनी सिद्ध करुन दाखविले आहे.

# मंजुषा

## - वय वर्षे ७५ - रहाणार जोगेश्वरी, मुंबई

मंजुषाबाईंना २ मुलगे व एक मुलगी आहे.  एका मुलाचे लग्न झाले व तो त्याच्या घरी पुण्याला रहातो. त्याला १९-२० वर्षांचा मुलगा आहे.  मुलीचेही लग्न होऊन ती कालिनाला रहाते. तिच्या मुलाचे लग्न ठरले आहे. ही दोन्ही मुले पोस्ट ग्रॅज्यूएट आहेत व चांगल्या पगारावर नोकरी करतात. दोघे आपल्या संसारात सुखी आहेत. मंजुषाबाई आपल्या पती व धाकट्या मुलासोबत रहातात.

त्यांचा धाकटा मुलगा आता ३८ वर्षांचा आहे. त्याला ऐकायला कमी येते. तो लहान असतांनाच  मंजुषाबाईंना हे लक्षात आले. त्या एका महापालिकेच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करत होत्या. त्यांचे पती एका खाजगी कंपनीत कामाला होते. आता त्यांचे वय ८५ वर्षे आहे. वयोमानाने त्यांना ऐकायला कमी येते. ते आता घरीच असतात.

मंजुषाबाई खूप बोलक्या, त्यांना माणसांत रहाण्याची व माणसे जोडण्याची खूप आवड. प्राथमिक शाळेत शिकवतांना मुलांवर जाणीवपूर्वक सुसंस्कार करण्याचे त्यांचे प्रयत्न होते. आपल्या मुलांनापण जाणीवपूर्वक जीवनकौशल्ये शिकविण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

मनिष हा सर्वात लहान मुलगा. तो लहान असतांना बोलत नव्हता. ३ वर्षांचा झाला तरी तो बोलत नव्हता. डॉक्टरांनी तपासल्यावर त्याला ऐकू येत नसल्याचे निदान केले. डॉक्टरांनी कानाचे मशीन लावावयास सांगितले. मंजुषाबाईंनी पैसे गोळा करुन मशीन विकत घेतले. पण मनिष मशीन वापरायला तयार नव्हता. तो शाळेत जायचा. घरी मंजुषाबाई त्याचा अभ्यास घ्यायच्या. खाणाखूणा करुन तो संवाद साधायचा. ओठांच्या हालचालींवरुन त्याला समोरच्याचे बोलणे कळायचे. पण बोलत नव्हता. मनिषची एस.एस.सी. परीक्षा झाली. तेव्हा मंजुषाबाईंना त्यांची एक विद्यार्थिनी भेटली. ती वाचा व श्रवण तज्ञ होती. तिने मनिषला बोलायला व ओठांच्या हालचाली स्पष्ट समजून घ्यायला शिकविले. मशीनचा वापर

करावयास लावले. २ वर्षांच्या सरावानंतर मनिष थोडे थोडे बोलू लागला. मशीन नियमित वापरु लागला. बाहेरुन त्याने ग्रॅज्युएशन केले. त्याला एका राष्ट्रीय बॅंकेत नोकरी मिळाली. तिथे त्याचे मित्रमंडळ बनले. तो रोज ट्रेनने ऑफिसला जातो. तिथले कामही त्याला आवडते.

मंजुषाबाई या दरम्यान निवृत्त झाल्या. आता घरी त्या व पती दिवसभर सोबत असतात. भावनिक रित्या आता त्यांना थकवा आला आहे असे वाटते. तिन्ही मुलांना वाढवतांना त्यांच्या पतीचा सहभाग कधीच मिळाला नाही. घरातील सर्व गोष्टी, मुलांच्या गरजा, त्यांना वाढवतांना येणाऱ्या अडचणी सर्वांना मंजुषाबाई एकट्याच तोंड देत राहिल्या. मनिषला डॉक्टरकडे नेणे, थेरापीसाठी नेणे, त्याच्याकडून गृहपाठ करुन घेणे, त्याचे कॉलेज, परिक्षा सर्व आघाड्यांवर मंजुषाबाई एकट्याच लढल्या. समाजाला ते दोघे एकत्र रहातांना दिसत होते पण घरात चित्र मात्र वेगळे होते. रोजचे व्यवहार, बॅंकेची कामे सर्व जबाबदारी मंजुषाबाई पार पाडत राहिल्या. या सर्वांतून महिन्यातून अर्धा दिवस मात्र त्या त्यांच्या मैत्रिणींबरोबर फिरुन येत. तेवढाच काय तो विरंगुळा होता.

आता निवृत्तीनंतर बाहेर जाणे कमी झाले. पण त्यांनी स्वत: एकपात्री नाटक लिहिले व बसवले. 'आधुनिक सावित्रीबाई' ह्या एकांकिकेमार्फत त्या सावित्रीची कथा सांगतात. आताची स्त्रिची परिस्थिती ह्यावर भाष्य करतात. शिवाय अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कामकाजही त्या पहातात. अंधश्रध्देवर आधारित एक एकांकिकाही त्यांनी लिहिली आहे. वयानुसार शारीरिक बंधने आली आहेत पण मनाने त्या उजून उमद्या आहेत.

कर्णबधीर मुलाला वाढवतांना त्यांना खूप त्रास झाला. एकतर अशा मुलाला जन्मभर सांभाळावे लागणार अशी घरच्यांची व बाहेरच्यांची प्रतिक्रिया. अशा अपंगत्वासाठी काय व कुठे मदत मिळते हे त्यावेळी माहितही नव्हते. त्यामुळे मंजुषाबाईंची खूप ओढाताण झाली. मागे वळून बघतांना मंजुषाबाईंना वाटतंय की खूप काही त्यांनी सहन केले. मनिषला वाढवतांना त्यांची खूप ओढाताण झाली. घर-नोकरी-त्याचे डॉक्टर शिवाय त्याचा अभ्यास ही सर्व तारेवरची कसरत होती.

आज मनिषला नोकरी मिळाली पण अजून त्याचे लग्न व्हायचे आहे. तो लग्नाला तयार नाही. त्याचे सर्व काही अजूनही मंजुषाबाईच पहातात. पण त्यांना मनात एक भीती वाटते की आता त्यांचे वय झाले, त्यांच्यानंतर कोण सांभाळणार?

शिवाय आणखी एक बाब म्हणजे त्यांचा नातू पुण्याला असतो. तो त्यांना खूप attached आहे. पण सुनेला वाटते की आजी त्याला बिघडवतेय. आता तो नातू १३ वीला आहे. पण तो कॉलेजला जात नाही. अभ्यास करत नाही. नैराश्यात गेला आहे. त्याला मदत करण्यासाठी मंजुषाबाईंनी एका समुपदेशकाची मदत घेतली आहे. त्यामुळे आता तो जरा त्या कोषातून बाहेर पडतोय. सून व मुलगा दोघांना वाटते की आपल्या मुलाला आजीने लाडावून ठेवला आहे. ह्या सर्व चक्रात त्यांचा कोंडमारा होतोय.

मुलगी ह्या सर्वापासून दूर राहू इच्छिते. ती म्हणते तिला तिचा संसार आहे. ती त्यातून वेळ काढू शकत नाही.

समाजात अपंगत्वाबद्दल आता जरा जागृती निर्माण झाली आहे. पण ४०-४५ वर्षांपूर्वी ह्याबद्दल फारसे माहित नव्हते. स्वत: शिक्षिका असूनही मंजुषाबाईंना बरेच प्रयत्न करुन माहिती घ्यावी लागली. सुदैवाने त्यांच्या विद्यार्थीनीच्या ज्ञानाची त्यांना मदत मिळाली. सर्वांनाच अशी मदत मिळेलच असे नाही.

कर्णबधीर बालकाला वाढवून त्याला त्याच्या पायावर उभे करण्याचे श्रेय मंजुषाबाईंना जाते. आज मनिष एका बॅंकेत चांगल्या पदावर आहे. पण तरी मंजुषाबाईंची काळजी पूर्णपणे मिटलेली नाही. मनिषच्या भविष्याची त्यांना अजूनही चिंता आहे. ह्या प्रवासात त्यांना आपल्या साथीदाराची मदत मिळावी असे वाटत होते पण तसे काही झाले नाही. ही सर्व जबाबदारी आईची असते म्हणून बाबांनी हात वर केले.

निवृत्तीनंतरच्या काळात स्वत:च्या समस्यांना तोंड देता देता मंजुषाबाईंनी

समाजसेवा करण्यास सुरुवात केली. त्यांनी एकांकिकेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्यास सुरुवात केली. आता वयामुळे त्या फार दूरदूर ठिकाणी जाऊ शकत नाहीत ह्याची त्यांना खंत वाटते. पण एकूण आयुष्याच्या अनुभवाने त्या म्हणतात की स्त्री खूप काही करु शकते. खूप चांगले घडवू शकते. त्यावेळी जर घरच्यांचा पाठिंबा मिळाला तर तो प्रवास तिला सुखकर होऊ शकतो. पण जरी असा पाठिंबा नसला तरी त्यासाठी रडत न बसता ती स्वत:च्या प्रयत्नांनी पुढे जाऊ शकते. जरा जास्त त्रास होतो, वेळ लागतो पण जिद्द ठेवली तर ध्येय गाठणे शक्य होते. ह्या प्रवासात त्या म्हणतात की खूप चांगली माणसेही भेटली. आपला हेतू चांगला असला तर कोणत्या ना कोणत्या मार्गाने आपल्याला मदत मिळत जाते.

जवळ आर्थिक गाठोडे नसले तरीही समाजाचे ऋण फेडण्यासाठी आपण बरेच काही करु शकतो. त्या म्हणतात, असाच खारीचा वाटा त्यांनी उचलला आणि आज त्यांना त्याचे खूप समाधान वाटते.

# मधुरीमा

एखाद्या मुलीचे मॉडर्न असणे, मॉडर्न कपडे घालणे हा गुन्हा आहे? तिला तिच्या आवडीनुसार कपडे घालण्याचा अधिकार नाही? आज ‘Mee Too”च्या माध्यमातून मुली, स्त्रिया व्यक्त होऊ लागल्या आहेत. पण अगदी आत्ता आत्तापर्यंत बलात्कार झालेल्या victims कडे पहाण्याचा दृष्टीकोन हा ’त्यात तिचीच चूक असणार’ हाच होता. आजही बऱ्याच अंशी हा समाज मुलींनाच दोषी ठरवतो. तिच्या वागण्या, बोलण्यावर, कपड्यांवर अंकुश ठेवला जातो. खरं पहाता गरज आहे ती पुरुषांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्याची.

कामाच्या जागी होणाऱ्या लैंगिक अत्याचारावर अटकाव आणण्यासाठी व झाल्यास त्यावर उपाययोजनेसाठी कायदा केला गेला. कामाची जागा ही महिलांसाठी सुरक्षित असावी व ही जबाबदारी employers ची असते. त्यावरून ‘Mee Too’च्या काही केसेस येत आहेत.

पण हे सर्व कामाच्या जागेबद्दल. इतरवेळी होणाऱ्या अत्याचारांचे काय? रस्त्यावरून चालतांना बऱ्याचदा मुलींना बरेच काही ऐकून घ्यावे लागते, कधी धक्के, स्पर्श सहन करावा लागतो. त्याकडे मुली दुर्लक्ष करतात. पण असे करण्याची हिंमत मुलांमध्ये येते कुठून?

कुटुंबात, शाळेत, समाजात मुलांवर मुलींप्रमाणे बंधने नसतात. उलटपक्षी मुलगा कसेही वागू शकतो, त्याला हवे ते तो घेऊ शकतो अशीच शिकवण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दिली जाते. परिणामी मुलगा त्याला हवे ते मिळवण्याचा अट्टहास करतो. एकतर्फी प्रेमात मुलीने नकार दिला तर तो स्वीकारणे मुलाला शक्य होत नाही. त्यातून ॲसिड अटॅकच्या केसेस घडतात. हेच मुलांचे aggression बलात्कारातही रुपांतरीत होऊ शकते.

अशा अपघटना मुलींवर खूप परिणाम करुन जातात. मनात खोलवर रुजून रहातात. गुन्हा करणाऱ्याला क्वचित प्रसंगी शिक्षा होते पण काहीही अपराध नसून जन्मभर

त्याचे परिणाम भोगते ते ती मुलगी! हा खरा अन्याय नाही का?

२२ वर्षाची मधुरिमा उच्चवर्गीय कुटुंबातली. घरात सर्व शिकलेले. वडिल व्यावसायिक, आई घरात असायची. पण तिचा मित्र-मैत्रीणींचा ग्रुप होता. ती पार्टीना जायची. वडिल त्यांच्या कामात व्यस्त असत. लहान भाऊ कॉलेजला आहे. घरात मुलगा-मुलगी असा फारसा भेद नव्हता. मधुरीमा स्वतंत्रपणे आपल्या आवडीप्रमाणे जगत होती. बी.एस.सी.च्या शेवटच्या वर्षाला होती. एकदा रात्री उशिरा घरी जात असतांना तिच्यावर एकाने बलात्कार केला. घरच्यांना याचा धक्का बसला. त्यादिवशी नेमकी ती रिक्षेने येत होती. नाहीतर रोज ती त्यांच्या कारने यायची.

मधुरीमा ही कॉलेजमध्ये शिकणारी मुलगी. शहरात रहाणारी. तिच्यावर एका रात्री असा प्रसंग ओढवला. पुरती खचून गेली ती. आपले शरीर असे कोणीही कसे ओरबाडू शकते या विचाराने ती अस्वस्थ होती.

मधुरीमाचे आई-वडील, भाऊ, मोकळे, पुढारलेले असल्यामुळे ती झाल्या प्रकाराबद्दल त्यांच्याशी बोलू तरी शकली. घरातल्यांनी तिला समजून घेतले पण 'आता वागतांना, वावरतांना काळजी घे' असेही सांगितले. तिच्या कपड्यांवर, रात्री बाहेर जाण्यावर निर्बंध आले. अर्थात्, बाहेरच्या जगात अशा मुलींना घरातही घेतले जात नाही हेही तिने पाहिले होते. त्यामुळे कुटुंब पाठीशी आहे ही भावनाच सुखावणारी वाटली तिला.

घरच्यांनी बाहेर याची वाच्यता होणार नाही याची काळजी घेतली. पण तिच्या मित्र-मैत्रीणींना हे कळले होते. आता ती जरा एकटीच राहू लागली होती.

ती घटना ... ती रात्र ... डोळे मिटले की सर्व डोळ्यांपुढे फिरत होते. दुसरे काही सुचतच नव्हते तिला. आजूबाजूचे, नातेवाईक, कॉलेजमधले सर्व 'हीच ती' अशा नजरेने बघून तिचे खच्चीकरण करत होते. तिला मात्र यातून बाहेर पडून नॉर्मल जीवन जगण्याची आस

होती. शिकायचे होते. पुढे जायचे होते. 'स्वत:चा काहीही दोष नसतांना तिने का सहन करावे?' हा तिचा प्रश्न. एखादा अपघात होतो. त्यात कुणी जखमी होते. त्यावर उपचार घेऊन परत नॉर्मल आयुष्य जगू लागते. मग बलात्कार हाही एक अपघातच नाही का? कोणी सांगायला जात नाही ना 'या, माझ्यावर बलात्कार करा!' मग एक अपघात समजून त्यातून बाहेर पडण्यासाठी तिने डॉक्टरांची मदत घेण्याचे ठरविले. डॉक्टरांनी समुपदेशनासाठी तिला पाठविले. बऱ्याच सेशन्स नंतर आता ती त्यातून सावरली आहे. तिचे शिक्षण पूर्ण करते आहे.

बलात्कार होणे ही एक घटना आहे. अपघात होण्यासारखीच तीही एक घटना आहे. ह्यात दोष त्या मुलीचा नसतो. बलात्कार करणारा अपराधी असतो. मात्र अपराध्याचे जीवन जगते ते ती मुलगी. असे का? समाजाच्या मते तिने रात्री बाहेर जाऊ नये, कपडे नीट घालावे, नीट वागावे, असे नीट पणे काय काय करावे याची यादी न संपणारी आहे. आणि हे "नीट" कोण ठरवणार तर पुरुषमंडळी. स्त्रिला स्वत:ला काही ठरविण्याचा अधिकारच नाही का? ती स्वत:ला आवडेल तसे इतरांना त्रास न देता जगू शकत नाही का? अरे पुरुषांनो, तुम्ही तुमचे डोळे बंद करा की. तुम्ही का बघताय मिटक्या मारत?!

मुलींच्या कपड्यांवर निर्बंध घालणारे एक सांगू शकतील का ७० वर्षांची म्हातारी बाई, काही महिन्यांच्या छोट्या मुली सुध्दा जेव्हा बलात्काराच्या शिकार होतात तेव्हा कपड्यांचा प्रश्न येतोच कुठे? रात्री बाहेर जाऊ नये पण बलात्कार काय फक्त रात्रीच होतात? बाहेरच होतात? जिथे स्वत:च्या मुलीला आपल्या वासनांची शिकार करणारे महाभाग बाप आहेत तिथे स्त्रियांना अक्कल शिकवण्याचा, निर्बंध लादण्याचा अधिकार पुरुषांना दिलाच कोणी? घरात होणाऱ्या अत्याचारांचे काय? वासनांध पुरुषच याला जबाबदार नाही का?

खरंतर बलात्कार करण्यामागचे कारण पुरुषातील विकृती हे आहे. पुरुषातला राक्षस त्यावेळी बाहेर येतो. मग ह्याचा विचार का नाही कोणी करत? सतत स्त्रियांना संरक्षण लागते, अशी भावना का? पुरुषांनो आता तुम्ही बदलायला हवेय. "स्त्रीची अब्रू म्हणजे काचेचे भांडे!" कोणी ठरविले हे? पुरुषांना काय अब्रू नसते? लैंगिक जीवन म्हणजेच सर्व जीवन का?

आपली काही चूक नसताना आपल्यावर ओढवलेल्या परिस्थितीत स्त्री कशी अपराधी ठरते? तिने हे अपराधीपण सोडून देऊन एक घडलेली घटना अशा तटस्थपणे पाहून आपले जीवन जगायला हवेय.

मधुरीमा हेच करते आहे. त्यामुळे आता ती त्यातून बाहेर आली आहे. समाजाला जेव्हा हे पहायला मिळेल तेव्हा तरी समाज आपले डोळे उघडेल का? समाजाचा दृष्टीकोन बदलेल का?

मधुरीमाचे कळकळीचे सांगणे आहे की कोणावरही असा प्रसंग आला तरी खचून जाऊ नका. त्यातून बाहेर पडून स्वत:चे जीवन आनंदाने जगा.

# सरला राजेन्द्र भावसार

- वय वर्षे ६६ - रहाणार जळगाव.

एका सामान्य कुटुंबातून आलेल्या, बेताच्या आर्थिक परिस्थितीवर मात करुन शिक्षण घेवून नर्सिंगच्या क्षेत्रात तन-मनाने झोकून देऊन कार्यरत असलेल्या सरलाताईंचे हे जीवन-चरित्र -

## एक आदर्श कुटुंब

सरलाताईंचा जन्म एका साधारण परिस्थिती असलेल्या सर्वसाधारण कुटुंबात पारोळा येथे झाला. वडिल श्री. गोकुळदास रामदास भारोटे यांचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शिवणकाम. त्यांना सात भावंडे, पाच मुली व दोन मुलगे. शिवणकामाचा व्यवसाय सांभाळून बेताच्याच आर्थिक परिस्थितीतही समाधानी राहून वडिलांनी सर्व भावंडांना शिकवले. मुलगा/मुलगी भेद न करता मुलींनाही शिक्षणास उत्तेजन दिले. वडिलांना समाजसेवेचीही आवड होती. घराचा रामरगाडा सांभाळून वेळात वेळ काढून त्यांनी समाजसेवेलाही हातभार लावला. ते भारतीय क्षत्रिय समाज, पारोळा या समाजाचे अध्यक्ष होते. संयुक्त खान्देश भावसार क्षत्रिय समाज, जळगाव, चावलखेडा येथे त्यांना समाजभूषण पदवी देवून गौरविण्यात आले. सर्व भावंडे शिकून आपापल्या क्षेत्रात करियर करु लागली. सरलाताईंची मोठी बहीण सौ.उषा गोजे जिल्हा परिषदेमधे एकात्मिक बालविकास योजना अधिकारी म्हणून कार्यरत होती. दुसरी बहिण शशिकला नायब तहसिलदार, मंदा व भाऊ धर्मेंद्र यांनी हायस्कूल टिचर म्हणून त्यांच्या क्षेत्रात उत्तम कार्य केले. मोठा भाऊ चंद्रकान्त भारोटे सरकारी वकिल व पुढे उपसंचालक म्हणून सेवानिवृत्त झाले.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर १९७० मध्ये सरलाताईंनी नर्सिंग प्रशिक्षणात प्रवेश घेतला. १९७४ पासून त्या सरकारी नोकरीत रुजू झाल्या.

रुग्णसेवेत मग्न असतांनाच अचानकपणे त्या विवाहबद्द झाल्या. ध्यानीमनी

नसतांना त्यांचे लग्न १९७८ मध्ये झाले. त्याची कहाणीही मजेशीर आहे. ९ मे १९७८ रोजी मोठ्या बहिणीचा विवाह पारोळा येथे होता. सरलाताई कावीळने आजारी असल्यामुळे त्यादिवशी सकाळीच जळगावहून परोळयाला गेल्या. घरी गेल्यावर बघतात तर सर्वत्र उदासीनता, चिंता दिसत होती. विचारल्यावर समजले की नवरदेवाने दुसऱ्या मुलीशी रजिस्टर पद्धतीने लग्न केलेले आहे व तो पुन्हा त्यांच्या बहिणीशी लग्न करायला आलेला आहे. भावाने संपूर्ण शहनिशा करुन खात्री केल्यावर आलेल्या वरातीला नवरदेवासकट परत पाठवले. त्याकाळीही चक्क मुलीकडून लग्न मोडले होते.

सरलाताईंचे लग्न श्री. केशवराव भावसार यांचा मुलगा राजेन्द्र याच्याशी ठरलेले होते. परंतु मुलाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर व त्यांच्या मोठ्या बहिणीचे लग्न झाल्यावर त्या विवाहबद्ध होणार होत्या. आता दाराशी घातलेला मांडव, पाहुणे मंडळी आलेली, झालेला खर्च याने वडिल चिंताग्रस्त होते. योगायोगाने राजेन्द्र लग्नाला आलेले होते. वडिलांनी केशवरावांना तार करुन बोलावून घेतले. घडलेली हकिकत, सर्व परिस्थिती त्यांना सांगितली व त्याच मांडवात त्यांचे राजेन्द्र सोबत लग्न लावण्याचा विचार केशवरावांना बोलून दाखविला. एका मुलीच्या बापाची अवस्था काय होते याचा अनुभव केशवरावांना असल्यामुळे त्यांनी या लग्नाला होकार दिला. त्यांनी होकार दिल्यावर मुलाची आई, आजी, काका, बहिण, जवळचे नातेवाईक यांना आणायला गाडी पाठविली. दुपारी ४ वाजता सर्व आले. पुन्हा विचार विनीमय झाला. मुलाच्या आजीने आता साखरपुडा करुन देवाचे केल्यावर लग्न सोहळा करावा असे सुचविले. परंतु त्यांचे सासरे म्हणाले, त्यांनी गोकुळशेटला शब्द दिला आहे. लग्न त्याचदिवशी व ठरलेल्या मुहूर्तावरच झाले. अशाप्रकारे बहिणीच्या मांडवातच संध्याकाळी ५ वाजता साखरपुडा, ५.३० ला हळद व गोरजमुहूर्तावर लग्न करुन रात्री ११ वाजता वरात पुन्हा जळगावला पोहोचली. अश्या रितीने अगदी फिल्मीस्टाईलने त्यांचे लग्न झाले. सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. कोणी कौतुक केले, कुणी नाराज झाले. पण वडिल व सासरे ठाम असल्यामुळे सर्व निभावून गेले. थोड्या दिवसात बहिणीचे पण सुस्थळी लग्न झाले.

लग्न झाल्यावर त्या सासरी गेल्या. त्यांना वाटले आता नोकरी सोडावी लागणार. पण नाही. त्यांचे सासरे खरच देवमाणूस होते. त्यांनी सांगितले, 'तुझी नोकरी ही एकप्रकारे

समाजसेवा आहे तेव्हा ती सुरु ठेव. घराकडेही लक्ष ठेव'.

त्यांच्या सासुबाई कावेरीबाई माहेरच्या श्रीमंत, मालेगावच्या पण कोणताही अहंभाव नसलेल्या. सरलाताईंचे ऐनवेळी असे आकस्मिक लग्न, त्यांना कल्पनाही नव्हती. कोणत्याही तयारीनिशी त्या आलेल्या नव्हत्या. पण ऐनवेळी त्यांनी आपल्या अंगावरील दागिने काढून सरलाताईंना घातले. कावीळ बरी झाल्यावर एक महिन्यानंतर प्रितीभोजन केले. त्यांच्या सासुबाईंनाही समाजकार्याची आवड होती. भावसार क्षत्रीय समाज महिलामंडळाची स्थापना शांताबाई हुबळीकर या अभिनेत्रीच्या हस्ते करण्यात आली. या मंडळाच्या माध्यमातून सासूबाई समाजसेवा आयुष्यभर करत राहिल्या. पुढे त्यांनी भावसार क्षत्रिय समाज जळगाव चे पहिल्या महिला अध्यक्षपद भूषविले.

सरलाताईंची नोकरी, घर संसार सुरु झाला. १९७९ मध्ये त्यांना पहिला मुलगा झाला. सासुबाई घरी देखभाल करत होत्या. लग्नापूर्वी त्यांनी बी.एस्.सी. नर्सिंग कोर्सचा फॉर्म भरला होता. त्याचा लग्नानंतर लगेचच कॉल आला. पण नुकतेच लग्न झालेले, त्यात कावीळने आजारी म्हणून त्या जाऊ शकल्या नाहीत. पुन्हा पुढील वर्षी कॉल आला पण मुलगा अगदीच लहान असल्याने त्यांनी जाणे टाळले. पण परत कॉल आल्यावर मात्र त्यांनी सासुबाई व पतीला सांगितले. सासरे, सासुबाई व पती सर्वांनी त्यांना प्रोत्साहन दिले व बाळाकडे आम्ही बघू, त्याला सांभाळू असे आश्वासन दिले व त्यांना मुंबईला जायला सपोर्ट केले. घरच्यांमुळेच त्या पुढचे करियर करु शकल्या असे त्या मनापासून सांगतात. असे कुटुंब सर्वांनाच मिळाले तर सासरही सर्वार्थाने मुलींचे स्वत:चे घर होऊन जाईल व त्याही यशस्वी होऊ शकतील असे त्यांना वाटते.

सासुबाई भावसार क्षत्रीय समाज महिलामंडळ, जळगावच्या अध्यक्षा होत्या तेव्हा त्यांनी १९८१-१९८५ दरम्यान दोन वेळा मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेतले होते. महाराष्ट्र शासनाने महिलामंडळाला रोख बक्षिस व प्रशस्त्रीपत्रक देवून गौरविले. त्या मंडळाच्या पहिल्या महिला अध्यक्षा होत्या. त्यांनी समाजातील कौटुंबिक प्रकरणे, अनेकांच्या संसारातील

अडचणी सोडविल्या. अनेक विवाह जुळविले. समाजाचा पैसा समाजाच्या उत्कर्षासाठी लावला, समाजाची वास्तू वृद्धिंगत केली, गरजूंना मदत केली. अजूनही त्यांचे समाजकार्य सुरुच आहे. नोकरीनिमित्ताने त्या महाराष्ट्रात विविध ठिकाणी गेल्या पण त्यांच्या मुलांकडे सासुबाईंनी कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही व समाजकार्यही त्याच निष्ठेने सुरु ठेवले. सासरेही सदैव त्यांच्या पाठीशी होते. मुलांची लग्ने हुंडा न घेता केली, मानपान, रुसवे-फुगवे काही न होता खेळीमेळीच्या वातावरणात विवाहसोहळे पार पाडले.

सर्व सुना म्हणजे जणू त्यांच्या मुलीच आहेत. सरलाताईंचा दिर किशोर याला दोन मुलीच. मुलगी झाल्यावर जाऊ सीमा हिला रडूच कोसळले कारण तिला भाऊ नाही व तिलाही मुलगीच झाली. पण बाकी सर्वांना खुप आनंद झाला. मुलगी झाली म्हणून त्यांनी पेढे वाटले. त्यांच्या घरात मुलाप्रमाणेच मुलींचे स्वागत होते. मुलगा-मुलगी समान वागणुक दिली जाते. एकत्र कुटूंबात तीन पीढ्या आजेसासु, सासु, सून आजही गुण्यागोविंदाने नांदत आहेत. भावसार क्षत्रीय समाज, जळगाव यांनी तीन पीढ्या एकत्र असलेल्या १६ कुटुंबांचा सत्कार समारंभ आयोजीत केला होता. परस्परांचा आदर राखून एकत्र रहाता येते, त्यातले फायदे अनुभवल्याशिवाय कळत नाहीत.

सरलाताईंच्या ३७ वर्षांच्या शासनसेवेत त्या बऱ्याच उपक्रमांत सहभागी झाल्या. सुरुवात स्टाफ नर्स पासून करुन ट्युटर सिस्टर व पुढे मेट्रन झाल्या. नंतर असिस्टंट डेप्युटी डायरेक्टर ऑफ नर्सिंग या पदाचे मुंबईत प्रभारी काम केले. मनात ठरवले तर चुल व मुल ही चाकोरी सांभाळून सुध्दा बाहेरच्या जगात स्त्री आपली कर्तबगारी नक्कीच सिद्ध करु शकते.

१. १९९४ मध्ये प्लेगच्या भयंकर साथीत त्यांनी रोग्यांची अखंड सेवा केली.

२. १९९५-९६ ला लांडगा चावलेल्या १७ रुग्णांना उपचार दिले.

३. मे १९९७ मध्ये शिरसोली येथे झालेल्या भयंकर अपघातात जवळपास ६० रुग्णांना आकस्मिक परिस्थीतीत सर्वतोपरी उत्कृष्ट सेवा दिली.

४. ३ डिसेंबर १९९८ रोजी सावदा गावाजवळ मोठा रेल्वे अपघात झाला.

अपघात ग्रस्तांवर सामान्य रुग्णालय, जळगाव येथे तातडीने उपचार दिले. त्यात त्यांचे प्राण वाचवता आले याचे समाधान त्यांना खूप काही देवून जाते.

५. सामान्य परिस्थितीतही रुग्णसेवेचे कार्य त्या मनापासून करत राहिल्या. क्षयरोग दिन, ८ मार्च जागतिक महिला दिन, जागतिक एड्स दिन अशा विविध उपक्रमातून समाज जागृती करण्याचे कार्य त्यांनी सुरुच ठेवले.

६. त्या काळी क्षय रोग झाला म्हणजे उपचारासाठी घरापासून दूर रहावे लागे. अशा रुग्णांना दिलासा व प्रेम मिळावे म्हणून हळदी-कुंकू समारंभ, रक्षाबंधन हे उपक्रम त्यांनी राबविले.

७. लैंगिक शिक्षणाचे महत्त्व जाणून १९९८ ला राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमात सहभागी झाल्या व तेथील पद्मावती लुंकड कन्या शाळेतील विद्यार्थिनी आणि प्रगती महिला मंडळाच्या महिलांना मार्गदर्शन केले.

८. भावसार क्षत्रीय समाजाच्या माध्यमातून वेळोवेळी रक्तदान शिबीरे आयोजित केली. महिला व समाजासाठी माता कुटुंब कल्याण शिबीर, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, सुदृढ बालक स्पर्धा, रक्तदानावर रांगोळी स्पर्धा ह्या माध्यमातून त्या समाजाला जागृत करत राहिल्या.

९. कमीतकमी मानवी शक्तीत जास्तीत जास्त आरोग्य सेवा कशी देता येईल याचे एक पॅटर्न त्यांनी निर्माण केले. ते आज जळगाव पॅटर्न म्हणून प्रसिद्ध आहे.

१०. पल्स पोलिओ कार्यक्रमात सहभागाबद्दल त्यांना अभिनंदन पत्र मिळाले.

११. महाराष्ट्र व्यसनमुक्ती कार्यक्रमात व रॅलीत सहभागी झाल्याबद्दल त्यांना सन्मानपत्र मिळाले.

१२. आरोग्य जागृती विषयीच्या आकाशवाणी कार्यक्रमात त्या सहभागी झाल्या.

१३. राज्यस्तरीय परिचारीका गणवेश परिवर्तन समितीमधे त्यांची निवड झाली.

अश्याप्रकारे मिळालेले कार्य उत्तम रितीने करण्याचा त्यांनी मनापासून प्रयत्न केला. त्याचीच दखल म्हणून रोटरी क्लब, लायन्स क्लब, विज्ञान मंच, ब्रिजलालाभाऊ चॅरिटेबल ट्रस्ट, पत्रकार संघ, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा ऑप्थॅल्मिक सोसायटी, जळगाव यांनी त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविले. जळगाव पॅटर्नमधील योगदानाबद्दल मा. आरोग्य

मंत्री यांच्याकडून त्यांना सन्मान पत्र देण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली याचा त्यांना आनंद वाटतो.



केंद्र सरकारतर्फे दिला जाणारा नर्सींग मधील सर्वोच्च राष्ट्रीय फ्लोरेंन्स नयटिंगेल पुरस्कारासाठी २००८ मध्ये सरलांची निवड झाली. १२ मे रोजी राष्ट्रपती भवन, दिल्ली येथे राष्ट्रपती मानिय प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार घेण्यासाठी त्यानी सासुबाईंना बरोबर नेले.

त्या या सर्वाचे श्रेय त्यांच्या कुटुंबियांना, आई, वडिलांना देतात. गरीब परिस्थितीतही आई-वडिलांनी शिकविले, सासरी प्रोत्साहन मिळाले, मुलांच्या जबाबदारीत सासरचा मोठा वाटा यामुळे बऱ्याच गोष्टी सुकर झाल्या. यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्रिचा वाटा असतो, त्यांच्या या यशामागे त्यांच्या पतीचा मोठा वाटा आहे असे त्यांना वाटते.

सरलाताई नर्सिंगच्या क्षेत्रात आल्या तेव्हा त्याबद्दल समाजाचा दृष्टीकोन फारसा चांगला नव्हता. गरजू म्हणून नर्स होतात असा समज, अप्रतिष्टित करियर होते ते. त्यामुळे ड्यूटी पण जास्त वेळ असायची. दिवसपाळी ८ तास, रात्रपाळी १२ तास सलग ७ दिवस

अशी असायची. आता यात बरेच बदल झाले आहेत. आता दिवसपाळी ६ तास, रात्रपाळी १ दिवस एका आठवड्यात अशी असते. मॅटर्निटी लिव्ह तेव्हा ३ महिने मिळायची. दिड महिना आधी व नंतर दिड महिना. फिडींग मदर साठी काही सुविधा नव्हत्या. पाळणाघरे नव्हती. यात आता बरेच फरक झाले आहेत याचा त्यांना आनंद आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे नवी उपकरणे आली आहेत जी Ready to use असतात. Instruments sterilised असतात त्यामुळे ती वेगळी तयारी करावी लागत नाही. हे बदल सुखावणारे आहेत, पण त्यात आलेली व्यावसायिकता मात्र त्यांच्या मनाला दुखावून जाते.

नर्सिंगच्या क्षेत्रात येऊन रुग्णांची सेवा करावी ही इच्छा घेऊन येणाऱ्या मुला-मुलींचं त्यांना कौतुक आहे. आता खूप नवे कोर्सेस आहेत ज्यात एम.एस्.सी, पी.एच्.डी करुन प्राविण्यासहित करीयर करु शकतो. आता फक्त मुंबईतच नव्हे तर सर्वत्र हे कोर्सेस करु शकतो. त्यामुळे संधी वाढल्या आहेत. या क्षेत्रात जास्तीत जास्त जणांनी यावे असेच त्या पोटतिडिकेने सांगतात.

नर्स ही फक्त डॉक्टरची मदतनीस असते असे नव्हे तर ती स्वत:ही आपल्या कौशल्याच्या, अनुभवाच्या आणि शिक्षणाच्या आधारावर बऱ्याच वेळा independently महत्त्वाचा role निभावू शकते. डॉक्टरांच्या अनुपस्थितीतही बरेच उपचार ती करु शकते. याचीच पुष्टी शासनाच्या निर्णयाने होते. आता केंद्र सरकारने नर्सला समाजामध्ये Nurse Practitioner म्हणून काम करण्याची परवानगी दिली आहे.

Nurses are backbones to health services.

नर्सशिवाय आरोग्य सेवा देता येईल का? तेव्हा त्यांना सन्मानाची वागणूक मिळायलाच हवी.

# सुमन

एक छोटीशी झोपडी. समोर २ पायऱ्या. एका कोपऱ्यात स्वयंपाकाचं साहित्य. दुसऱ्या कोपऱ्यात सुमन आपल्या मशीनवर गोधडी शिवताना दिसतेय. होय! हेच तिचे उपजीविकेचे साधन. स्वत:हून चालू न शकणारी.  पहिलीपर्यंत सुमन नॉर्मल होती. दुसरीत असताना तापाचे निमित्त झाले आणि अपंगत्व आले.  अडचणींवर मात करुन स्वकर्तुत्त्वावर आपले व आपल्या आईचे पोट भरते. सुमनला एक मोठा भाऊ व लहान बहिण आहे. मोठा भाऊ तिच्यापेक्षा दीड वर्षांनी मोठा व बहिण तीन वर्षांनी लहान. सुमनचे वय आता १६-१७ वर्षे असावे. ती खूप बोलकी आहे. बोलतांना ती त्यात खूप रमून जाते. आपली कहाणी सांगतांना ती खूपदा मध्ये जरा थांबत होती. आठवून सांगत होती. तर काही वेळा डोळे पाणावत होते. एक जाणवले की समोर आपले कोणी ऐकून घेते आहे ही  जाणीव तिला सुखावत होती. तिचे मनही मोकळे होत होते. तिची भाषा ऐकणाऱ्याला गुंतवून ठेवणारी होती.

सुमनचा जन्म आणि तिच्या आयुष्याची पहिली पाच वर्षे इतर भावंडांप्रमाणेच गेली. तिला शाळेत घातले. ती पहिलीत गेली. ती जरा हळू चालायची पण चालतच शाळेत जायची. दुसरीत गेल्यावर तिला चालणे कठीण जाऊ लागले. पायात काही त्राणच नाही असे जाणवू लागले. कसेबसे ती शाळेत जायची पण दुसरीचे वर्ष ती पुरे करु शकली नाही. घरुनच अभ्यास करुन परीक्षा दिली व ती पास झाली. असे पुढच्या वर्षीही झाले. पण आता घरातल्या घरातही चालणे तिला अवघड होऊन बसले. मग डॉक्टरांकडे नेले.

सुमन एका गावात रहाते. तिथून डॉक्टरांकडे शहरात जायचे म्हणजे वाहन हवे. शिवाय सोबत कोणीतरी हवेच. तिचे वडील नोकरीला जायचे व भाऊ तसा मोठा नव्हता की एकटा तिला नेऊ शकेल. ह्यामुळे डॉक्टरांकडे जाण्याचे पण लांबतच होते. शेवटी एकदा तो योग जुळून आला. डॉक्टरांनी विविध चाचण्या सांगितल्या. परत त्यासाठी शहरात यावे लागणार, पुन्हा ते ठरवण्यात काही महिने गेले. असे तिच्या आजाराचे निदान करण्यातच ८-१० महिने गेले.  तिला Muscular Distrophy म्हणजे स्नायूंची कमकुवतता आहे असे

डॉक्टरांनी सांगितले.

या अशा आजाराबद्दल तर गावात कोणालाही माहिती नव्हती. सुमनचे आईवडिलही घाबरुन गेले. पोरीची जात आणि अशी लंगडी, पांगळी झाली तर कसे होणार? मग काय तिला औषध देत होते. पण उपचार करुन घ्यायला वारंवार शहरात जाणे अशक्य होते. सुमन मोठी होत गेली. भाऊ-बहिण शिकले. सुमन त्यांची पुस्तके वाचायची. तिला वाचनाची फार आवड. आपण बाहेरुन परिक्षा द्याव्यात असे तिला वाटे. पण घरचे म्हणायचे की ती शिकून काय करणार? ती घरकाम करायची. घरात सरपटत फिरायची. नंतर इतरही स्नायू कमकुवत होत गेले. पण तरीही तिने जिद्दीने शिवणकाम करायचे ठरविले. घरात एक शिवणाची मशिन होती. तिची आई ते वापरायची. सुमनने पिशव्या, गोधड्या शिवायला सुरुवात केली. गावात थंडीच्या दिवसात पांघरायला गोधड्या लागतात. गावातले मग तिच्याकडून गोधड्या शिवून घ्यायला लागले. भावाचे लग्न झाले. बहिणही लग्न होऊन सासरी गेली. दोन्ही लग्नात तिला नेले नाही. त्यांच्या रहात्या घराच्या बाजूची एक खोली भावाने तिला रहायला दिली. उरलेल्या घरात भाऊ-वहिनी रहातात. भाऊ तिला क्वचितच भेटायला येतो. पण तिच्याकडे कोण येते व ती कोणाच्या संपर्कात आहे ह्यावर त्याची कडक नजर असते.

सुमनला लहान मुलांशी बोलायला-खेळायला आवडते. गावातली, जवळपासची काही मुले-मुली तिच्याकडे दुपारी येतात. सुमन त्यांना काही गोष्टी वाचून दाखवते. त्यांना अभ्यास शिकवते. तेवढाच तिला विरंगुळा वाटतो.

सुमनचा दिवस सकाळी आईबरोबर सुरु होतो. बाथरुमला जाण्यासाठी समोरच्या २ पायऱ्या उतरुन जावे लागते. तिथे जायला तिला मदत लागते. सकाळी आई तिला घेऊन जाते. सारखे जावे लागू नये म्हणून सुमन दिवसभर पाणी पीत नाही. जेवणही बेताचेच करते. आई सकाळी जेवण बनवते व कामाच्या शोधात बाहेर जाते आणि काही काम मिळाले तर करते, संध्याकाळी परत येते. आई जाताना सुमनला तिच्या मशीनजवळ बसवून बाजूला जेवण ठेऊन जाते. इथून तिचा स्वत:चा दिवस सुरु होतो. दुपारपर्यंत ती गोधड्या शिवते. मग थोडे जेवण करुन ४ वाजता जवळच्या मुलांना शिकवते. सुमनची शाळा दुसरीतच सुटली. पण

तिला शिकण्याची खूप आवड. ती आजूबाजूच्या मुलांकडून पुस्तक वाचून घेत शिकली. आता लहान मुलांना शिकवते. सुमनला लिहायची पण आवड आहे. आपले अनुभव ती एका वहीत लिहून काढते.

सुमनला नटायला, छान छान कानातले घालायला आवडते. पण बाजारात नेणार कोण? मग ती शिकायला येणाऱ्या मुलांना पैसे देते व तिला हवे ते त्यांच्याकडून मागवते.

संध्याकाळी आई आली की सुमन गोधड्यांचे पैसे आईकडे देते. तिच्याबरोबर जेवण झाले की एकदा बाथरुमला जाऊन येते व झोपते.

सुमनचा सख्खा भाऊ शेजारी रहातो. त्याला तिची लाज वाटते. तिच्यामुळे त्याला व आईला त्रास होतो असे त्याचे म्हणणे. तो कोणालाही तिची ओळख करुन देत नाही. बरोबर कुठल्याही ठिकाणी नेत नाही. आईलाही असेच वाटते. सुमनची त्यांना जबाबदारी वाटते. ही का आमच्या नशिबी आली असे त्यांना वाटते.

भावाला तिचे शिकवणे...लिहिणे पण आवडत नाही. एकदा तिने लिहीलेली वही त्याला सापडली ती त्याने फाडून टाकली. आता पण ती लिहिते पण लपवून ठेवते.

आपल्या आजारामुळे हळूहळू तिचे सर्व स्नायू कमकुवत होत आहेत. वयानुसार तिला नटावे-फिरावे असे वाटते. पण तिचे विश्व म्हणजे तिची लहानशी खोली, बाहेर अंगण व त्यात मधून मधून येणारी मुले. आज बोलतांना तिला त्यामुळेच खूप आनंद वाटत होता. ती तिच्या आयुष्याकडे खरंच खूप परिपक्व वृत्तीने पहात होती. आपल्याला कोणी जोडीदार असावा असे तिला वाटते पण ती हेही जाणून आहे की तिच्या लग्नाबद्दल घरात कोणी विचारच करणार नाहीए. हिला काय करायचे आहे लग्न करुन? हिला कोण पत्करणार, कोण जोडीदार सापडणार? आणि मुळात तिला लग्नाची गरजच काय? अशी शारीरिक व्याधी असल्यावर लग्नाचा प्रश्नच येत नाही असे त्यांचे मत होते.

सुमनला वाटते की ती जर इतरांसारखी असती तर आज तिच्या संसारात मग्न

असती. पण ती असेही म्हणते की मग तिला अशा मुलींच्या व्यथांची जाणिवही झाली नसती. तिला आपले अनुभव इतरांना सांगायचे आहेत. समाजाने काय करावे; किंबहुना काय करु नये हे मांडायचे आहे. अशा व्यक्तीची होणारी कुचंबणा व्यक्त करायची आहे. यासाठी ती लिहिते. तिला वाटते की तिचे हे लिखाण समाजापर्यंत पोहचावे. तिच्या ह्या उपक्रमाला आपण शुभेच्छा देऊया.

सुमनला एकच प्रश्न सतावतो - 'जे काही झाले त्यात तिचा काय दोष? जे सहन करावे लागतेय ते शारीरिक आहेच पण आपल्याच माणसांमुळे ते मानसिकही झाले आहे. पण तरीही त्यावर मात करुन ती स्वत: कमावती झाली आहे. तिची आणि आईची उपजीविका त्यावर चालू आहे. तिचं आयुष्य ती तिच्या परीने सुसह्य करण्याचा प्रयत्न करतेय. तर त्यात कोणी साथ न देता तिलाच दोषी का मानताहेत? हा कुठला न्याय?'

# गोदावरी

## - वय ८८ वर्षे - मूळ गाव पाचोरा

पाचोरा एक खेडेगाव. गोदावरीबाईंचा जन्म तिथे झाला. त्या चौथीपर्यंत शिकल्या. त्यांना लिहिता वाचता येते. तल्लख बुध्दी व गायनाची प्रचंड आवड. संगीताचे शिक्षण घेतले नसले तरी जात्यावरची गाणी ऐकून पाठ, अभंगही तोंडपाठ म्हणत. ४-५ मैत्रिणींना गोळा करुन त्या भजने म्हणत. बायकांच्या कार्यक्रमात त्यांना आग्रहाने गायला सांगायचे. त्यांचे लग्न अवघ्या १२ व्या वर्षी झाले. वर्षभरात त्यांना पहिला मुलगा झाला. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

त्यांचे पती शिवणकाम करत. अखंड मशीनवर काम चाले त्यांचे. घरात एकत्र कुटुंब होते. दिर, त्याचे कुटुंब, सासू-सासरे, १३-१४ जणांचे घर. घरातली सर्वात धाकटी सून म्हणून सर्व कामे त्यांच्यावर पडत. घरचा पीढीजात व्यवसाय होता शिवणकामाचा. दोघे भाऊ व सासरे सर्व जण त्यात सहभागी होते.

गोदावरीबाईंचे पती एस.एस.सी. पास होते. त्यांना एका थेटरमध्ये नोकरी मिळत होती पण घरच्यांनी जाऊ दिले नाही. शिलाईकामच करायचे असा त्यांचा आग्रह होता. सासऱ्यांच्या शब्दाबाहेर कोणी नव्हते. घरात भांड्याला भांडे लागायचे पण ते तेवढ्यापुरतेच. पुढे दिरांच्या मुलाचे लग्न झाले. घरात नवीन सून आली. गोदावरीबाईंना वर्ष-दीड वर्षांच्या अंतराने आठ अपत्ये झाली. त्यातली तीन अपत्ये अल्पशा आजाराने गेली. पाच अपत्ये चांगली शिकली. मोठी झाली. मोठा मुलगा, त्यानंतर २ मुली नंतर एक मुलगा व शेवटी एक मुलगी. आज सर्वांची लग्ने झाली आहेत. त्या सर्वांनी आज साठी ओलांडली आहे.

गोदावरीबाईंच्या दुसऱ्या अपत्याच्या वेळी घरात कोणत्यातरी कारणाने मोठे भांडण झाले. सासरे तापट स्वभावाचे. त्यांनी गोदावरीबाई, तिचे पती व दोन अपत्ये ह्यांना नेसत्या कपड्यांवर घरातून बाहेर काढले. गोदावरीबाई व त्यांचे पती स्वाभिमानी होते. त्यांनी हार मानली नाही. जवळच्या एका खेड्यात जाऊन ते राहिले. एका शेतावर गोदावरीबाई

मजूरीचे काम करु लागल्या. त्या शेताच्या मालकाकडेच एका छोट्याश्या खोलीत ते सर्व राहू लागले. कोणी चूल दिली. कोणी भांडे दिले. कोणी कपडे दिले असे करत काही दिवसात संसाराला लागणारे सामान गोळा झाले. दिवसभर मजूरी करुन पैसे मिळत त्यावर घर चालत होते. त्यांच्या पतीनेपण छोटेमोठे काम शोधून काढले. दिवस जात होते.

गोदावरीबाईंच्या माहेरी हे सर्व कळले पण त्या स्वाभिमानी होत्या. त्यांनी तिथून मदत घेतली नाही. स्वत:च्या कष्टाने संसार चालवला. त्यातच गळा गोड होता. गावच्या भजनीमंडळात त्यांना अभंग म्हणायला बोलवत. नंतर त्यांनी किर्तन करणे सुरु केले. त्या किर्तन खूप रंगून करत त्यामुळे समोरचा त्यात गुंग होत असे. हळूहळू त्यांनी शिलाईमशीन विकत घेतली. घरात शिवणकाम सुरु केले. त्या स्वत: पिशव्या शिवून विकत. हळूहळू मुले मोठी होत होती. मोठा मुलगा एस.एस.सी. बोर्डात पहिला आला. रस्त्यावरच्या दिव्याखाली अभ्यास करत होता. सर्वांनी त्याचे कौतुक केले. त्याने पुढे शिकावे असे सर्वांनी सुचवले पण त्याने नोकरी करण्याचा निर्णय घेतला. आईवडिलांच्या कष्टाला थोडा आराम मिळावा असे त्याला वाटत होते. ओळखीने त्याला एका बॅंकेत नोकरी मिळाली. त्याचे अक्षर छान होते म्हणून बॅंकेत त्याला लिखाणाचे काम सांगत.

आपल्या इतर  भावंडांनी मात्र शिकावे असे त्या मुलाला मनापासून वाटत होते. इतरांना त्याने कॉलेजला घातले. सर्व भावंडे ग्रॅज्यूएट झाली. त्याने स्वत: बाहेरुन परीक्षा देऊन पोस्ट-ग्रॅज्यूएशन केले. बॅंकेत बढती मिळत गेली.

हा मुलगा आता तीशी पार केली तरी लग्नाला तयार होत नव्हता. त्याला देशाची सेवा करायची होती. शिवाय कुटुंबाची जबाबदारी होतीच. त्याने लग्न करावे म्हणून गोदावरीबाईंनी खूप हट्ट केला. खूप प्रयत्नांनी तो लग्नाला तयार झाला. त्याचे लग्न झाले. बॅंकेतही बढती मिळत गेली तशी बदलीही होत राहिली मग तो व त्याचे कुटुंब बदलीच्या गावी राहू लागले. दुसऱ्या मुलासही नोकरी लागली. गोदावरीबाई व त्यांच्या पतीस आता थोडा आराम मिळू लागला. त्यांनी त्यांचे भजनीमंडळ सुरु केले, किर्तन करु लागल्या. पती देवपूजा

व वाचनात मग्न असत. नातवंडांमध्ये त्यांचा वेळ जात होता.

पुढे सर्वांची लग्ने झाली. मुली आपापल्या संसारात रमल्या. गोदावरीबाई आपल्या पतीसमवेत लेकींकडे जात. दोन्ही मुलांसोबत आनंदात रहात. भजनीमंडळ होतेच. सर्व आनंदात होते.

आता मागे वळून बघतांना गोदावरीबाईंना आश्चर्य वाटते की शून्यातून केवढे निर्माण झाले. गोदावरीबाईंची देवावर खूप श्रध्दा आहे. पण कर्मावर विश्वास आहे. त्यांचे पती शांतपणे तासंतास देवपूजा करतात. त्या स्वत: मात्र दोन हात जोडून नमस्कार करतात. कर्म करणे हीच देवपूजा असे त्या मानतात. देवाची भजने गाताना आपण देवाशी बोलतोय असे त्यांना वाटते. त्यात या समरसून जातात.

वयाच्या लहानपणीच झालेली ८ बाळंतपणे, मोलमजूरी, कष्टाची कामे या सर्वांचा त्यांच्या शरीराचर नक्कीच परिणाम झाला आहे. आता तब्येतीच्या तक्रारी सुरु झाल्या आहेत. औषधे चालू आहेत. आपली मुले कर्तुत्ववान निघाली याचा त्यांना सार्थ अभिमान  आहे.

आयुष्यात खूप चढ-उतार आले. पण पतीने आणि मुलांनी साथ सोडली नाही. गोदावरीबाईंच्या अंगात खूप गुण होते. त्या सर्वांच्या बळावर त्यांनी संसार उभा केला. पुढे मुलांसोबत शहराच्या ठिकाणी आल्या. रहाणीमान उंचावले. पूर्वी रहायला झोपडीही नव्हती आता मोठ्या फ्लॅटमध्ये रहायला मिळतेय. त्यांच्या मते दिवस बसून रहात नाहीत. दु:खामागून सुख येते. आपण मात्र प्रयत्नाने त्यावर मात करत रहायला हवे.

आता त्या शरीराने थकल्या आहेत पण मनाने अजूनही काही तरी करत रहावे अशी उभारी आहे. त्यांच्या या समाधानी आयुष्यामागच्या कष्टांना मात्र खरंच सलाम करावा असे वाटते.

# मीना

एका लहानशा खोलीत तिघांचं छोटं कुटुंब आज आनंदाने रहातंय. पण काही वर्षांपूर्वी ह्या घरात एका कळीने जन्म घेतला. मुलगी झाली म्हणून नाराजी पसरली. 'मुलगा वंशाचा दिवा'. आता तर मुलगी झाली ह्याची निराशा. अशा रितीने मीनाचं ह्या जगात स्वागत झालं. नकळत्या वयात त्याचं काही वाटलं नाही पण नंतर एका जिद्दीने तिने घराचा आधार बनण्याचा मनोमन निर्धार केला. त्यासाठी शिकण्याचा हट्ट धरला.

घरची प्रचंड गरीबी. वडिल रिक्षा चालवून पैसे कमावत. त्यातून मुलीला शिकवून काय करायचं ह्या विचारसरणीचे. पण मीनाने निर्धाराने त्यांचं मन वळवलं. हट्ट धरला. शेवटी वडिलांना मान्य करावेच लागले. तिला शिकण्याची परवानगी मिळाली.

मीना होती पण जात्याच हुशार. त्यात स्वत:ला शिकल्याशिवाय पर्याय नाही ह्या जिद्दीने मनापासून अभ्यास करुन पुढे जात राहिली. स्वत: मेहनत करुन, शिक्षकांकडून माहिती गोळा करुन आपल्या ज्ञानात भर घालत मोठी होत होती. तिचं ध्येय एकच होतं, आपली परिस्थिती बदलायची. हे असं गरीबीचं जिणं किती दिवस जगायचं? आपल्या आई-वडिलांना सुखाचे दिवस दाखवायचे. ह्याच जिद्दीत ती ग्रॅज्युएट झाली. नोकरीसाठी प्रयत्न सुरु झाले. तोवर अशीच छोटी-मोठी कामे करुन कमावत होती. नोकरी मिळाली आणि मग दिवस पालटले. घरात सुधारणा झाल्या. रोजची खायची भ्रांत कमी झाली.

आज मीनाचे वय २१ वर्षे आहे. त्यांच्या घरातली ती एकमेव ग्रॅज्युएट आहे. मीनाच्या जन्मानंतर २ भावंडे झाली. एक मुलगी व एक मुलगा. पण दोघेही काही महिन्यांची असतांना दगावले. नंतर मात्र तिच्या आईला मूल झाले नाही. ती घरात एकुलती एक राहिली. ती मुलगी म्हणून बरीच बंधने घरातून व बाहेरुन होती. हे सर्व तिला त्रासदायक वाटायचे पण तिने सर्व लक्ष शिक्षणावर केंद्रित केले होते. ह्या बंधनांचा विचारही केला नाही. ती अभ्यासू होती. बाहेर उगीच फिरायला ती जात नव्हती. ह्या बंधनांचे पालन तिच्याकडून होत होते.

आज तिचे वडिल अभिमानाने सांगतात की ती शिकून चांगली नोकरी करते. सर्व श्रेय अर्थातच ते स्वत:कडे घतात. मीनाची त्याबद्दलही कुरकुर नाही.

तिला अजूनही आठवते की ती लहान असतांना तिला आपण खूप शिकायचे हे आतून वाटत होते. त्यासाठी तिला अट्टाहासाने वडिलांना मनवावे लागले होते. वडिल म्हणायचे की ती शिकून काय करणार? शेवटी चूल-मूलच तिला सांभाळावे लागणार आहे. तिच्या लग्नाला पैसा लागणार तो कुठून आणणार? ती शिकली की तिला तसा शिकलेला नवरा कसा मिळणार? शिवाय शिकतांना कोणाशी मैत्री केली तर? समाज काय म्हणेल? आपली नाचक्की होणार? इत्यादी.इत्यादी. मीनाने त्यांना त्यांची बदनामी होईल असे वागणार नाही, फक्त कॉलेजात जाणार, बाकी कुठे जाणार नाही, कोणा मुलाशी मैत्री तर सोडाच पण बोलणारही नाही, अशी बरीच वचने दिली तेव्हा कुठे त्यांनी तिला शिकायला परवानगी दिली.

मीनाने आपली वचने पाळली. कोणाशी मैत्री केली नाही. बाकीचे लोक तिला शिष्ट, घमंडी, एकलकोंडी म्हणायचे. त्याकडेही तिने दुर्लक्ष केले. तिचे एकच ध्येय होते ते म्हणजे शिकायचे व नोकरी करुन घरची गरीबी घालवायची.

मीनाला ह्यासाठी आपल्या मनाला बऱ्याचदा मुरड घालावी लागली. तिच्या अंगच्या सुप्त गुणांना कधी वर येऊ दिले नाही. तिला फिरायला आवडते, नवीन माणसांची ओळख करुन घ्यायला आवडते. गायला, नाचायला आवडते. असे बरेच काही आवडते पण तिच्या वचनांनी तिला बांधून ठेवले होते. शिकायचे आहे तर या सर्वांचा विचारही तिने मनात येऊ दिला नाही. आज तिला थोडी खंत वाटते की स्वत:चे जीवन ती मनाप्रमाणे जगू शकली नाही. त्याचबरोबर एकीकडे आनंद, समाधानही वाटते की आपले ध्येय आपण पूर्ण केले. स्वत: घर चालवण्याची क्षमता तिच्यात आहे. 'मी मुलापेक्षा कमी नाही' ही शर्यत तिने लावली व ती जिंकली. पण व्यक्ती म्हणून ती जगू शकली नाही. "आज मुली मुलांच्या बरोबरीने पुढे जातात व मुलांसारखे कर्तुत्त्व गाजवतात" अशी वाक्ये ऐकली की मनाला दु:ख होते. मुलगा-

मुलगी दोन्हीही स्वतंत्र व्यक्ती आहेत. त्यांच्यात चढाओढ का? दोघांना आपले व्यक्तीमत्व स्वतंत्रपणे घडवू दिले पाहिजे. मुलीने वा मुलाने कसे वागावे यांची नियमावली वेगळी का असावी? व्यक्तीने कसे वागावे याची नियमावली का नसावी?

मुली कितीही कर्तबगार असल्या तरी शेवटी त्या मुलीच रहातात हे दुखद सत्य आहे. ही स्थिती बदलायला हवी. मीनाला आज अशा मुलींची साथ लाभायला हवीय.

आज तिच्या वडिलांना तिचा अभिमान वाटतो. 'मुलगा वंशाचा दिवा' हा विचार त्यांनी आता सोडून दिलाय. किंबहुना मीनाने आपल्या कर्तुत्त्वाने त्यांना मुलगी पण वंशाचा दिवा होऊ शकते हे पटवून दिलेय.

# विमल

## - वय ७२ वर्षे.

विमलताईंचा जन्म घोडदे ह्या गावी झाला. त्यांचे वडिल मुलींच्या शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांना एक लहान भाऊ आहे. विमलताई चौथीपर्यंत शिकल्या. वडिल जरी मुलींच्या शाळेत मुख्याध्यापक असले तरी त्यावेळच्या समाजाच्या दबावाखाली त्यांना मुलीला शिकवणे शक्य नव्हते. त्यामुळे विमलताईंना इच्छा असूनही शाळा सोडावी लागली.

विमलताईंचे लग्न ठरले. मुलगा चांगला शिकलेला, पोस्ट-ग्रॅज्यूएट होता. सरकारी नोकरी होती. लग्नानंतर त्या शहरात आल्या. त्यांचा मोठा दिर सुध्दा शहरात आपल्या कुटुंबासह रहात होता. सासू-सासरे गावी रहायचे. अधून मधून शहरात यायचे. लग्नानंतर माहेर लांब असल्याने जाणे-येणे कमी होते. त्यांच्या नवऱ्यानेही बाळंतपणाशिवाय दुसऱ्या कोणत्याही कारणाने त्यांना माहेरी पाठवले नाही. बाळंतपण माहेरच्यांनी करायचे ही प्रथा आहेच.

विमलताईंना ३ मुली व एक मुलगा झाला. पहिली मुलगी झाल्याने सासरचे थोडे नाराज झाले. दुसऱ्या मुलीच्या वेळेस तर नाराजी अजून वाढली. मात्र नंतर मुलगा झाला आणि सर्वांना आनंद झाला. त्यांच्या दिरालाही ३ मुली व १ मुलगा होता. पहिल्या दोन मुलीच होत्या त्यामुळे सासारचे नाराज होत होते. तेव्हा ४-५ अपत्ये असतच. मुलाच्या नंतर परत मुलगी झाली. आर्थिक स्थिती तशी बरी होती. नवऱ्याच्या पगारात काटकसरीने विमलताई संसार करत होत्या. घरात नोकर-चाकर नव्हते. सर्व घरकाम त्या स्वत: करत. मुली थोडी फार मदत करायच्या. मुलगा तसा लाडाचा होता. त्याला शिकवणे समाजमान्य होतेच. पण मुलींना कोण शिकवणार? ती शिकली तर डोक्यावर मिरे वाटेल, वाया जाईल, कुणाचा तरी हात धरुन पळून जाईल  समाजात नाचक्की होईल अशी भीती होती.

विमलताईंच्या सासरच्या लोकांचे हेच मत होते. पण त्यांनी मात्र मुलींना

शिकवण्याचा हट्टच धरला. जिद्दीने त्यांनी मुलींना शाळेत घातले. सासरचे नाराज होते. वाईटपणा आला पण त्या म्हणत, मला नाही शिकता आले पण माझ्या मुली शिकतील, पुढे मोठ्या होऊन मार्गी लागतील. विमलताईंच्या सुदैवाने त्यांना नवऱ्याची साथ होती. त्यामुळे दोघांनी मुलींना शिकवले. मुलीपण हुशार होत्या. मन लावून अभ्यास करायच्या. आईला मदतही करायच्या. त्यांना आईच्या कष्टाची जाणीव होती. आईमुळे आपण शिकू शकतोय हे त्या जाणून होत्या. पहिल्या मुलीला डॉक्टर करण्याचा निर्णय घेतल्यावर घरचे फारच बिथरले. तीव्र विरोध केला त्यांनी. पण विमलताई ठाम राहिल्या. त्यांची जिद्द पाहून त्यांच्या नवऱ्यालाही हुरुप आला. हट्टाने त्यांनी तिला डॉक्टर केले. त्यांच्या जातीत ती पहिली डॉक्टर मुलगी. आता हिचे लग्न कसे होते ते बघतोच म्हणून घरचे आव्हान देत होते. ५५-६० वर्षांपूर्वी मुलगी थोडी मोठी झाली, ९-१० वर्षांची झाली की लगेच तिचे लग्न लावून दिले जात असे. अशा वेळी विमलताईंच्या मुलीचे वय २१ झाले शिकता शिकता. तेव्हा अशा घोडनवरीला कोण पत्करणार? पण विमलताई शांत होत्या. त्यांचा देवावर विश्वास होता. त्या म्हणत आपण जर चांगले काम करतोय तर देव आपलं वाईट कशाला करेल? मुलगी डॉक्टर होऊन सेवा करेल. लग्नाचे काय एवढे? दुसरी मुलगी व मुलगा पण डॉक्टर झाले. धाकटी मुलगी कॉमर्सला गेली. त्यात शिक्षण पूर्ण केले.

जरी घरचे म्हणत होते की ह्यांच्या मुलीचे लग्न जमणारच नाही तरी विमलताईंच्या मोठ्या मुलीचे लग्न तीची internship सुरु असतांनाच ठरले. दुसऱ्याही मुलीचे लग्न सुस्थळी झाले. मुलाने प्रेमविवाह केला. त्यावेळी विमलताई त्याच्या पाठीशीही खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्याच्या प्रेमाविषयी खात्री पटल्यावर नवऱ्याला ते मान्य करायलाच लावले. आनंदाने सुनेचे स्वागत केले. तिलाही मुलगीच मानली.

विमलताईंनी आपल्या सर्व मुलांची लग्ने हुंडा न देता व न घेता केली. त्यांना मुली साठी हुंडा देणे म्हणजे तिला विकल्यासारखे तेही पैसे देऊन असे वाटे. त्यांच्या पतीचाही विचार तोच होता. म्हणून उभयतांनी ठरवून हुंडा देणार नाही हे आधीच मुलाकडच्यांना स्पष्ट केले होते. त्यामुळे त्यांना जावई शोधतांना बऱ्याच अडचणी आल्या. पण विमलताई ठाम होत्या. त्यांच्या दुसऱ्या मुलीचे लग्न ठरले. साखरपुडाही झाला. त्यानंतर काही दिवसांनी

मुलाकडच्यांची एकेक मागणी येऊ लागली. तेव्हा मुलीची बाजू असूनही, साखरपुडा झालेला असतांनाही विमलताईंनी लग्न मोडायला लावले. त्यांचा मुलगा एम.डी. झाला होता. त्यांच्या समाजात अशा शिकलेल्या मुलासाठी लाखो रुपये हुंडा मिळाला असता. पण विमलताईंना हुंड्याची अपेक्षाच नव्हती. त्यांनी मुलाच्या इच्छेप्रमाणे नोंदणी पध्दतीने त्याचे लग्न करुन दिले. सुनेच्या घरच्यांची इच्छा होती म्हणून reception ठेवले.

मुलीना शिकवण्याच्या त्यांच्या निर्णयामुळे आयुष्यभर त्यांना घरच्यांची बोलणी खावी लागली. बऱ्याचदा घरच्या कार्यक्रमांतून त्यांना वगळण्यात आले. त्यांचा मान कोणी ठेवला नाही.

त्या जात्याच प्रेमळ होत्या. त्यामुळे घरी कोणीही आले तरी जेवल्याशिवाय जात नसे. दारी येणाऱ्या प्रत्येकाशी त्या दोन शब्द तरी बोलत. सुख-दु:ख विचारत. अगदी भाजीवाला असेल तरी त्याला पाणी-चहा देत. घरचे नाही तरी बाहेरचे मात्र त्यांना मानत.

आज विचार करतांना त्यांना त्यांचेच आश्चर्य वाटते की एवढी शक्ती आली कुठून आपल्यात? पण म्हणतात ना "घार उडे आकाशी- चित्त तिचे पिलापाशी". तसेच त्यांना एक आई म्हणून आपल्या मुलींची परवड थोडी तरी कमी करायची होती. जीवनात त्यांनी काहीतरी करुन दाखवावे, पुढे जावे हे त्यांना मनोमनी वाटत होते. त्याच जिद्दीत त्यांनी आयुष्यभर लढा दिला.

आज त्यांच्या मुलींनाही आईचा अभिमान आहे. आज आपण जे काही आहोत ते केवळ त्या माऊली मुळे हे त्या कधीच विसरु शकणार नाहीत. आज समाजात त्यांच्या मुलींना मान मिळतोय तो केवळ त्यांच्या शिक्षणामुळे व जडणघडणीमुळे. समोरच्यातला माणूस बघा, त्यांची जात नाही. माणूस म्हणून दुसऱ्याला मान द्या. जन्माला आलो ते काहीतरी करुन दाखवण्यासाठी. दुसऱ्याच्या सुखात तर सहभागी व्हावेच पण दु:खातही साथ सोडू नये. हे विमलताईंचे म्हणणे आहे.

समाजाच्या विरोधात जाऊन आग्रहाने, जिद्दीने आपल्या एक नव्हे तर तीनही मुलींना चांगले शिक्षण दिले, जीवनात चांगले वागायला शिकवले त्या मातेला शतश: प्रणाम!

# मीनल

बाळाची चाहूल! किती आनंदाची बातमी, किती उत्साह संचारतो सगळयांमध्ये बाळाच्या स्वागतासाठी!

पण! हो पणच! बाळ जन्मानंतर एखादीचं आयुष्यच बदलून जातं!

मीनल, २४-२५ वर्षांची तरुणी. किती उत्सुक होती बाळाच्या आगमनासाठी. आणि झालीही तिला गोड, गोंडस मुलगी. बाळंतपणात मीनलला अपंगत्व आलं. Hemipledgia मुळे तिचं अर्ध अंग लुळं पडलं. शरीराची एक बाजू अपंग झाली.

बाळंतपणासाठी ती माहेरी आली होती. २ महिने उलटून गेले तरी सासरी कोणी तिला नेण्याचा विषयच काढत नव्हते. वाट बघून एके दिवशी तिनेच विषय काढला पण नवऱ्याने हात वर केले. मला आता तुझ्याबरोबर संसार करता येणार नाही असे स्पष्ट सांगितले. तिला तर तिचा संसार फार प्रिय होता. हवा होता. कितीतरी स्वनं पाहिली होती तिने तिच्या संसाराची.

पहिले बाळंतपण माहेरी करायचे म्हणून सातव्या महिन्यातच तिला माहेरी आणले. तिचा नवरा  नोकरी करायचा. घरात त्याची आई व वडिल होते. त्यांच्या एका बहिणीचे लग्न झाले होते. घरात आई होती त्यामुळे त्याच्या जेवणाची सोय होत होती. बाळंतपणापूर्वी तो दर आठवड्याने तिला भेटायला यायचा. सूखी जोडपे होते ते. पण बाळंत झाली, एक तर मुलगी झाली आणि दुसरे म्हणजे तिला अपंगत्व आले. माहेरच्यांनी तिची नीट काळजी घेतली नाही असा त्याचा आरोप. मुलगी झाल्यामुळे बघायलाही तो आला नाही. त्यांना मुलगा हवा होता. सासरचे निराश झाले. मीनलच्या मनावर खूप ताण पडला. एकतर पहिलंच बाळंतपण. मुलाची काळजी घेण्याची फारशी माहिती नव्हती. त्यात स्वत:चे पण दुसऱ्यांवर अवलंबून रहाणे. पण माहेरचे खूप काळजी घेत होते. ती लाडकी मुलगी व बहिण

होती. भाऊ व आईवडिल तिला कशाची कमी पडणार नाही ह्यासाठी सतत दक्ष होते. मुलगी छान गुबगुबीत होती. तिचे पण कौतुक होत होते. बारसे ठरले. सासरचे कोणी आले नाही. नवराही येत नव्हता. मीनलचे आता माहेरी मन रमत नव्हते. तिचे उपचार चालू होते. ती हळूहळू घरातल्या घरात चालू लागली. उजवा हात व पाय अधू झाला होता. पण ती व्यायाम करत होती. हळूहळू त्यांची पण हालचाल व्हायला लागली होती. ती स्वत:ची कामे स्वत: करु लागली. मुलीला घरचे सांभाळत होते. मुलगी आता २ वर्षांची झाली. तिच्या शाळेचा आता प्रश्न येणार. मीनलला सासरी जायचे होते. तिने आईवडिलांना तसे बोलूनही दाखवले. सासरच्यांच्या वागणूकीमुळे तिला परत सासरी कसे पाठवायचे असा त्यांना प्रश्न पडला होता. पण तिने खूपच आग्रह केल्यामुळे तिचे वडिल तिला सासरी घेऊन जायला तयार झाले.

ते एका रविवारी तिच्या सासरी गेले. घरात तिचा नवरा व सासू-सासरे होते. प्रथमतर ते ह्यांच्याशी बोलायला तयारच नव्हते. तिच्या वडिलांनी खूप विनंती केली की एकदा तरी तिला भेटायला या, नातीला पहा. तसे त्यांनी बघू असे सांगितले. मीनलचे वडिल निराश झाले पण तसे मीनलला काही जाणवू दिले नाही. ते भेटायला येतील असे तिला सांगितले. मीनल रोज वाट पहायची. कोणी आले नाही म्हणून २-३ महिन्यांनी वडिल परत त्यांना विनंती करुन आले. पण कोणीही आले नाही. फोनही उचलत नव्हते. शेवटी पंचायतीला त्यांनी मध्यस्थ म्हणून घातले. पंचायत बोलावली. पण त्यावेळीही कोणी आले नाही. मीनल खूप निराश झाली. माहेरी सर्व होते पण सासरी जायचे व संसार करायचा अशी तिची इच्छा होती.

तिचे सासरचे गाव एक तासाच्या अंतरावर होते. पुढे सहा महिन्यांनी त्या गावाच्या पंचायतीने मीनलच्या वडिलांना बोलावले. त्या पंचायतीत तिच्या नवऱ्याने दावा मांडला होता व काडीमोड मागितला होता. त्यांच्या जातीत पंचायतीत काडीमोड घ्यायची पध्दत आहे. पंचायतीत तिचे वडिल व भाऊ हजर राहिले. मीनल आता अधू झाली आहे म्हणून त्याला ती परत नको होती. खरंतर त्याने अगोदरच दुसरे लग्न केले होते. मीनल बाळंतपणासाठी माहेरी आली तेव्हा तो तिला भेटायला यायचा. घरी पण ठीक होते. पण

मुलगी झाली कळल्यावर त्याच्या घरच्यांनी त्याचे दुसरे लग्न लावून दिले. पण हे मीनलकडे कोणाला माहित नव्हते. पंचायतीत जेव्हा त्याने दावा मांडला तेव्हाही हे लपवूनच ठेवले होते. गावातल्या इतर माणसांकडून मीनलच्या घरच्यांना हे समजले. त्यांना खूप राग आला, पण मुलीची बाजू! शिवाय मीनल काही त्यांना जड नव्हती.

पंचायतीत मीनलला बोलायला किंबहुना हजर रहायलापण सांगितले नाही. पंचांनी काडीमोड ठरविला. मीनलच्या वडिलांनी हे मीनलला सांगितले. त्यादिवशी मीनल खूप रडली. घरचे तिला आधार देत होते. आज समाजात स्त्रिची स्थिती पहा कशी आहे. तिचा काहीही गुन्हा नसतांना तिला न विचारता राजरोसपणे तिचा संसार मोडला जातोय. मीनलला तरी माहेरचा आधार आहे. असा आधार सर्वांना फारच क्वचित मिळतो.

काही दिवस मीनलला स्वत:ला सावरण्यात गेले. मात्र नंतर तिने खंबीर व्हायचे ठरविले. मुलीला मोठे करायचे व तिला या दुष्टचक्रात अडकू द्यायचे नाही असे तिने ठरवले.

माहेरी राहून ती घरासमोर छोटंसं दुकान मांडून चॉकलेट, गोळया विकू लागली. मुलगी मोठी होत होती. आई, भाऊ साथ देत होते. ते तिला अपंगांच्या कोट्यातून नोकरी मिळव म्हणून मागे लागले आहेत. पण तिला तिचा संसार हवा होता. ती म्हणते, "माहेरी सर्व माझ्या बाजूने आहेत पण मी संसार करण्याचे स्वप्न पाहिले आहे. मला सासरी जायचे आहे. जे काही झाले त्यात माझा काय दोष? काय चूक? देव न करो पण असं काही माझ्या नवऱ्यासोबत झाले असते तर मी त्याला सोडलं असतं का? कधीच नाही! उलट सेवा करुन त्याला लवकरात लवकर बरे केले असते. मग जे माझ्या नशिबी आले ते मी एकटीने का भोगायचे? का स्वत:चा संसार सोडून असे एकटीने आयुष्य जगायचे? जीवनात येणाऱ्या अडचणी कोणाच्या हातात असतात का? मग मलाच ही शिक्षा का?"

मीनलाला पडलेले हे प्रश्न खरंच खूप काही सांगताहेत. आज स्त्रियांची स्थिती समाजात दुय्यम आहे. त्यातून अपंग स्त्रिया दुहेरी हिंसाचाराला बळी पडतात. समाज बदलेल का? आपण याचा डोळसपणे विचार नको का करायला?

# सविता
## - वय ५८ वर्षे

सविताबाईंचा जन्म मनमाडला झाला. त्यांना ३ भाऊ व ३ बहिणी होत्या. ७ भावंडांमध्ये त्यांचा ६ वा नंबर होता. त्यांच्या वडिलांना मुलींचा खूप राग होता. ते खूप कडक होते. मुलींनी उगाच कुठे उभे राहिलेले, गप्पा मारत बसलेले त्यांना अजिबात चालत नसे. 'काही काम नसेल तर दळणे दळा' असे ते म्हणत. अशा कर्मठ घरामध्ये त्या मोठ्या होत होत्या. त्यांच्या पत्रिकेत कडक मंगळ होता. त्यांच्या मते लग्न जुळवतांना पत्रिका बघणे अनिवार्य होते. कडक मंगळ असलेल्या मुलीचे लग्न जमणे अशक्य होते. जसाजसा लग्न जमायला वेळ लागत होता तसतसे त्यांचे वडिल मुलीवर राग काढत होते. शेवटी एकदाचे त्यांचे लग्न एका बीजवराशी ठरले. त्यांचा होणारा नवरा ग्रॅज्यूएट होता. सरकारी नोकरीत होता. शहरात रहात होता. पण पगार फारच तुटपुंजा होता. सविताबाईंचे लग्न ठरले आणि त्यांच्या वडिलांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. तसे तर सविताबाईंना शिकायचे होते. लग्नाचे त्यांच्या मनातच नव्हते पण वडिलांपुढे त्यांचे काही चालले नाही. तेव्हा निदान वडिलांच्या मनाला तरी शांतता मिळाली यात त्यांनी समाधान मानले.

जणू काही मुलीचे लग्न होणे हेच तिच्या जीवनाचे इतिकर्तव्य! मुलींनी जन्माला यायचे ते कोणाचा तरी संसार करायलाच का? आदर्श पत्नी, सून, आई बनणे हेच का तिच्या जीवनाचे ध्येय असावे?

त्यांचे लग्न झाले आणि सविताबाई शहरात रहायला आल्या. शहरातील रहाणी आत्मसात करायला त्यांना वेळ लागला. पण त्यांनी सर्व शिकून घेतले. त्या स्वत: ७ वी पर्यंत शिकल्या होत्या. ७ वी नंतर वडिलांनी शाळेची (२ रुपये) फी भरणे बंद केले. त्यामुळे इच्छा असूनही त्यांना पुढे शिकता आले नाही. लग्न झाल्यावर वडिलांच्या धाकातून सुटल्या पण आता नवऱ्याच्या धाकात रहात होत्या. त्यांची नणंद अकाली विधवा झाली होती. ती व तिची मुले त्यांच्याकडेच रहात असत. नणंद दिसायला खूप सुंदर होती. याचा तिला गर्व होता.

सविताबाई दिसायला सर्वसाधारण होत्या. याचसाठी त्यांची नणंद त्यांचा राग राग करायची. खरे तर जेव्हा त्यांची नणंद विधवा झाली तेव्हा त्यांच्या पतीनेच तिला नर्सिंगचे प्रशिक्षण देवून नोकरीस लावले होते. पण मोठी बहिण म्हणून ती तिचा आब राखून होती. त्यांच्या पतीचेही तिच्यापुढे काही चालत नसे.

सविताबाईंचा संसार सुरु होता. पण लग्नाला ५ वर्षे झाली तरी त्यांना मुलबाळ होत नव्हते. नणंदेला त्यांना छळायला अजून एक कारण मिळाले. ती नेहमी म्हणे की 'माझ्या तळहाताला एकवेळ केस येतील पण तुला या जन्मात मूल होणार नाही!' साविताबाईंनी हे कधी मनावर घेतले नाही. आपली नणंद आहे म्हणून त्यांनी तिला नेहमीच आपले मानले. पहाटे ३ वाजता उठून अंघोळ करुन त्या तिच्यासाठी डबा करुन देत. तिच्या मुलाला व मुलीला संभाळत. नंतर मुलीचे लग्न झाले. जावयाचा त्यांच्या घरावर डोळा होता. असेही सविताबाईंच्या पतीने घर आपल्या बहिणीच्या नावावर घेतले होते. त्यामुळे ऐन दिवाळीत काही तरी भांडण काढून या दोघांना त्याने नेसत्या कपड्यानिशी घराबाहेर काढले. थोडे दिवस तिथेच बाहेर अंगणात राहून काढले. मग पतीच्या मित्राच्या ओळखीने जवळच्या उपनगरात दुसरे घर भाड्याने घेतले.

आता दोघांचा संसार एकेक वस्तू जमवत सुरु झाला. गावी त्यांची शेती होती. पण त्यांच्या पतीने गाव सोडल्यामुळे व विधवा बहिणीला नोकरीला लावल्यामुळे घरचे सर्व नाराज होते. सासू-सासरे मात्र मधून मधून येत असत. हे दोघेही काही कारणाने गावी जात असत. होईल तेवढी मदत करत. पैसे पाठवत.

आता सविताबाईंना दिवस गेले. पहिला लाडाकोडाचा मुलगा झाला. दोघांना खूप आनंद झाला.

स्त्रिच्या आयुष्यातला हा दुसरा महत्त्वाचा टप्पा! एखाद्या स्त्रिला मूल होत नसेल तर समाज तिलाच दोषी ठरवून मोकळे होतो. इथे तर सविताबाईंना घरातच त्यावरुन टोमणे ऐकावे लागत होते. त्रास सहन करावा लागत होता. माहेरी वडिलांनी सक्त ताकीद दिली होती, सासरकडून काही तक्रार येता कामा नये. काहीही झाले तरी तुला माहेरी थारा मिळणार

नाही. अशा परिस्थितीत सविताबाईंना दिवस गेल्यावर त्या थोड्या सुखावल्या. निदान आता तरी छळ थोडा कमी होईल असे त्यांना वाटले.

स्त्रिचे लग्न हा पहिला टप्पा - तिला मूल होणं हा दुसरा टप्पा. त्यासाठीच तिचे जगणे आहे. एखादीला नाही मूल झाले तर काय आयुष्यभर तिने त्यासाठी दु:खात रहायचे का? मग मूल न असलेल्या पुरुषांचे काय? त्यांना नाही का दु:ख होत? एकट्या स्त्रिची जबाबदारी आहे का ही?

काहीही असले तरी साविताबाई आहे त्या परिस्थितीत आनंदी रहाणाऱ्या होत्या. त्याप्रमाणे त्यांनी बाकीच्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले.

पतीचा पगार अगदीच कमी असल्याने पैश्याची कायम चणचण असायची. पण सविताबाईंनी खूप काटकसर करुन संसार केला. कधी कुठे बाहेर फिरणे नाही, बाजूच्या सर्व बायका सिनेमा बघायला जात पण सविताबाई कधी गेल्या नाहीत. आहे त्या पैश्यात महिना काढणे त्यांना मुश्किल जायचे. तरी त्या आवडीने संसार करत होत्या. नंतर त्यांना एक मुलगी व एक मुलगा झाला. सर्व मोठे होत होते.

नणंदेने घरातून हकलून दिले तरी राखी-पौर्णिमा आणि भाऊबीज कधी चुकवली नाही. सविताबाईंनीही सर्व जुने मनात ठेवून तिचे स्वागत केले. सविताबाईंना वाटे, अकाली वैधव्य आले आहे. संसाराचा गाडा नोकरी करुन स्वत:च चालवत आहे नणंद, म्हणून थोडे जरी आपण तिचे दु:ख हलके करु शकलो तर बरे!

मुलांना त्यांनी शाळेत घातले. साधे चॉकलेट सुध्दा घेऊन देता येत नाही मुलांना म्हणून त्यांना खूप वाईट वाटे. तेव्हा त्यांना एका शाळेत नोकरी मिळत होती. पण त्यांच्या पतीने ती करु दिली नाही. पतीला वाटे की ही नोकरी करु लागेल तर बाहेर पुरुषांशी बोलेल म्हणून त्यांनी परवानगी दिली नाही. बघा! स्वत:च्या बहिणीला शिकवून नोकरी लावून देणारा तोच पुरुष आपल्या बायकोबद्दल काय विचार करतो! त्यांच्या पतीची पहिली बायको

त्यांच्या संशयी स्वभावाला कंटाळून त्यांना सोडून पळून गेली होती. त्यामुळे जेव्हा ते दोघेच राहू लागले तेव्हा सुरुवातीला सविताबाईंनाही त्यांच्या 'कोण आले होते? कुठे गेली होतीस?' अशा असंख्य प्रश्नांना तोंड द्यावे लागत होते.

त्यांचा मोठा मुलगा ग्रॅज्युएट झाला. चांगली नोकरी करु लागला. मुलीचेही शिक्षण पूर्ण झाले. सविताबाईंनी तिला नोकरी करण्यास प्रवृत्त केले. स्वत:च्या पायावर उभी रहायला लावले. तिचेही लग्न झाले. तिसरा मुलगा अजून शिकत आहे. मोठ्या मुलाचे लग्न झाले. सुनेला त्या मुलगीच मानतात. त्यांना एक नात आहे. सर्व एकत्र रहातात. त्यांनी केलेल्या काटकसरीची दोन्ही मुलांना कल्पना आहे त्यामुळे ते आईला खूप मानतात.

आज वयोमानाप्रमाणे त्यांची तब्येत तक्रार करते. तरूण पणात केलेले कष्ट आता शरीरावरचा परिणाम दाखवत आहेत. असे असले तरी आपल्या नातीमध्ये त्या रमल्या आहेत.



**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची आठ, अविनाश नगरकर यांची चार,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. सुजाता मोरे चव्हाण

यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com